म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
ग्रं. क्र. १२८७
१९५८

# ध्रुपद

विंदा करंदीकर

REFBK-0010596
REFBK-0010596

७४३५०
११।३।७१

१९८८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. काव्य
अनुक्रम ७४३५० दि. ११।३।७१
नोंद १९८८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

## लेखकाचीं इतर पुस्तकें

**स्वेदगंगा** (मे, १९४९; दुसरी आवृत्ति : डिसेंबर, १९५८)

**मृद्गंध** (डिसेंबर, १९५४)

**ॲरिस्टॉटलचें काव्यशास्त्र** (ऑगस्ट, १९५७)

**स्पर्शाची पालवी** (जानेवारी, १९५८)

# ध्रुपद

विंदा करंदीकर

REFBK-0010596
REFBK-0010596

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९०५८

पॉप्युलर बुक डेपो, मुंबई ७

किंमत पांच रुपये

© सौ. सुमा करंदीकर

पहिली आवृत्ति
७ सप्टेंबर १९५९

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

प्रकाशक :
गणेश रामराव भटकळ
पॉप्युलर बुक डेपो
लॅमिंग्टन रोड, मुंबई ७

उदयच्या आईला

# अनुक्रम

## जातक


१ क्षणांत अद्‌भुत होतें १
२ शब्दांची माती झाल्यावर ३
३ हात मारितां अपुल्या भाळीं ४
४ धैर्य लागतें हसावयाला ५
५ माझें मला आठवलें ६
६ मला टोचतें मातीचें यश ८
७ उंट ९
८ विल्याची जर वेळच आली ११
९ काय गुन्हा तो निव्वळ माझा १२
१० कृपा १३
११ गांठ १४
१२ पोसवलेली केळ म्हणाली १९
१३ शपथ तुला २०
१४ मुक्तीमधलें मोल हरवलें २२
१५ आकाशाचें वजन भयंकर २४
१६ शरीर आलें शरण घराला २६
१७ किलबिललेलें उजाडतांना २८
१८ पिसाळलेल्या उग्र खुन्यासम ३०
१९ हात तुझा तो ३२
२० चोळी ३३
२१ उगाच गळतें थोडें पाणी ३५
२२ चित्रगंधा ३६

| | | |
|---|---|---|
| २३ | फूल मुकें राहाणारच नाहीं | ३७ |
| २४ | पापानंतर | ३९ |
| २५ | खडक फोडतो अपुले डोळे | ४० |
| २६ | वाळूंतिल वाळूंतच | ४२ |
| २७ | अनामिकाचा हात अहोरूप | ४४ |
| २८ | चिंधी | ४६ |
| २९ | तीन प्रवासी | ४८ |
| ३० | हुश्शार | ५० |
| ३१ | उभारलेली | ५१ |
| ३२ | क्षितिजायितम् | ५२ |
| ३३ | फार फार तर | ५४ |
| ३४ | वर्दळवेडी | ५५ |
| ३५ | भोवळभोळीं | ५६ |
| ३६ | जेव्हां आलिस गंधअंधशी | ५७ |
| ३७ | उंबरठ्याला शिवुन पळाली | ५८ |
| ३८ | धुक्यांत उठले सरपटशत्रू | ५९ |
| ३९ | दुःखच बनलें आज विदूषक | ६० |
| ४० | नसांत घुसलें भलतें पाणी | ६१ |
| ४१ | घेता | ६२ |
| ४२ | सनातनी | ६३ |
| ४३ | काळेंभेरें | ६४ |
| ४४ | अशा रेषा-रंगांमध्यें | ६५ |
| ४५ | नाहीं ढासळलें दार | ६६ |
| ४६ | खोट्या पैशाचें गाणें | ६७ |
| ४७ | ओंजळींत स्वर तुझेच | ६९ |
| ४८ | म्हातारी | ७० |
| ४९ | माथेरान : एक भास | ७१ |
| ५० | माथेरान : एक आभास | ७२ |
| ५१ | जाऊं नये तेथें गेलों | ७३ |

## मुक्तसुनीतें


५२ संहिता ७४
५३ हे ब्रह्मसत्ता ! ८०
५४ एकट्याच्या भोंवतीं रात्र गिरमिटते ८१
५५ पण हें श्रेय तुझेंच आहे ८२
५६ मी तुला पाहिलेलें नाहीं ८३
५७ तूं गात रहा; गीतांत रहा ८४
५८ आज प्रार्थना प्राणाएवढी ८५
५९ तिचीं पावलें वाजत नसतात ८६
६० धुमसणारा डावा पाय ८७
६१ हे माडांनो ८८


## तालचित्रें


६२ दीपचंदी ८९
६३ झपताल ९०
६४ दादरा ९१
६५ झुमरा ९२
६६ रूपक ९३
६७ आडाचौताल ९४
६८ आदिताल ९५


## आततायी अभंग


६९ वाजवितां वाळा । मिठी घाल ९६
७० सद्‌गुरुवाचोनी । सापडेल सोय ९७
७१ कांही केल्या आतां । मोक्ष हा टळेना ९८
७२ मातीचे हे कण । हसताती ९९
७३ आतां मला कळ । सोसवेना १००
७४ अगा माझ्या देवा । साधलीस वेळ १०१

२३ फूल मुकें राहाणारच नाहीं ३७
२४ पापानंतर ३९
२५ खडक फोडतो अपुले डोळे ४०
२६ वाळूंतिल वाळूंतच ४२
२७ अनामिकाचा हात अहोरूप ४४
२८ चिंधी ४६
२९ तीन प्रवासी ४८
३० हुश्शार ५०
३१ उभारलेली ५१
३२ क्षितिजायितम् ५२
३३ फार फार तर ५४
३४ वर्दळवेडी ५५
३५ भोवळभोळी ५६
३६ जेव्हां आलिस गंधअंधशी ५७
३७ उंबरठ्याला शिवुन पळाली ५८
३८ धुक्यांत उठले सरपटशत्रू ५९
३९ दुःखच बनलें आज विदूषक ६०
४० नसांत घुसलें भलतें पाणी ६१
४१ घेता ६२
४२ सनातनी ६३
४३ काळेंभेरें ६४
४४ अशा रेषा-रंगांमध्यें ६५
४५ नाहीं ढासळलें दार ६६
४६ खोट्या पैशाचें गाणें ६७
४७ ओंजळींत स्वर तुझेच ६९
४८ म्हातारी ७०
४९ माथेरान : एक भास ७१
५० माथेरान : एक आभास ७२
५१ जाऊं नये तेथें गेलों ७३

## मुक्तसुनीतें


५२ संहिता ७४
५३ हे ब्रह्ममत्ता! ८०
५४ एकट्याच्या भोंवतीं रात्र गिरमिटते ८१
५५ पण हें श्रेय तुझेंच आहे ८२
५६ मी तुला पाहिलेलें नाहीं ८३
५७ तूं गात रहा; गीतांत रहा ८४
५८ आज प्रार्थना प्राणाएवढी ८५
५९ तिचीं पावलें वाजत नसतात ८६
६० धुमसणारा डावा पाय ८७
६१ हे माडांनो ८८


## तालचित्रें


६२ दीपचंदी ८९
६३ झपताल ९०
६४ दादरा ९१
६५ झुमरा ९२
६६ रूपक ९३
६७ आडाचौताल ९४
६८ आदिताल ९५


## आततायी अभंग


६९ वाजवितां वाळा । मिठी घाल ९६
७० सद्‌गुरुवाचोनी । सापडेल सोय ९७
७१ कांही केल्या आतां । मोक्ष हा टळेना ९८
७२ मातीचे हे कण । हसताती ९९
७३ आतां मला कळ । सोसवेना १००
७४ अगा माझ्या देवा । साधलीस वेळ १०१

७५ पाठ आणि पोट । यांचा झाला टाळ १०२

७६ ज्यानें केलें पुण्य । त्यानें केलें पाप १०३

७७ आहे हा जिव्हाळा । जागृताचा १०४

७८ विज्ञानाचा द्रोह । हीच माया १०५

७९ आशीर्वाद द्याया । हात उंच १०६

८० येतसे फाटकें । कुल्यावरी १०७

८१ सद्गुरुची मेख । सुवर्णाची १०८

८२ अंधाराची कूस । हुंदक्यानें भरे १०९

८३ मातीला या भेगा । नको पाहूं ११०

८४ घ्यावें सर्व नाणें । वाजवोनी १११

८५ सज्जनाचें बळ । पायामध्यें लुळें ११२

८६ मानवाचें सारें । माकडांच्या हातीं ११३

८७ का रे नाडवीसी । आपुल्या मनासी ११४

८८ समर्थांच्या हातीं । जन्ममृत्यू ११५

८९ अगा कृपावंता । आवर हें दान ११६

९० दैत्यांचें या भय । भय देवांचेंही ११७

९१ विटेवरी उभा । खिशामध्यें हात ११८

९२ आधीं केलीं मतें । मग केला नर ११९

९३ अव्यय तें एक । सांडलें गा १२०

९४ ‘ मी ’च्या वेलांटीचा । सुटो सुटो फांस १२१

९५ मानवाचें अंतीं । एक गोत्र १२२

# ध्रुपद

वा. क्र. १०५८८

## क्षणांत अद्भुत होतें

मला न मिळलें होतें मीपण माझें—
जरी समजलें होतें,
किलबिलणारीं पानें
पिउनी दूध उषेचें
पुटपुटती कां टिपटिपणारें गाणें.

मला न मिळलें होतें मीपण माझें—
जरी उमगलें होतें,
साधेभोळे दिसणारे हे डोंगर
पसरुन अपुल्या शरिराचें अवडंबर
गुडघ्यामध्यें खुपसुन अवजड डोकें
वाट पाहती पुढच्या उग्र क्षणाची.

मला न मिळलें होतें मीपण माझें—
जरी उमगलें होतें,
आम्रतरूच्या सगुण सावलीखालीं
रवंथ करणाऱ्या रेडयाला पडतें
स्वप्न भाबडें अजुनी ज्ञानेशाचें.

मला न मिळलें तरिही मीपण माझें;
मला न कळलें होतें मीही आहें;
जरी समजली होती
महानुभावी भाषा, संकेत तिचे.

परंतु जेव्हां
तुझ्या उरांतिल गुदमरणारें गाणें
गाउं लागलें स्पर्शपल्लवी गाथा
अन् फुटला क्षण,
अनुभवलें मीं प्रथमच माझें मीपण, रक्तस्वप्नसें.
मी धडपडलों,
ठेच लागुनी चंद्राची, सूर्याची;
आणि चाटली वीज भयानक, स्वेदगंधिता;
मला उमगलें मीही आहें, आहें,
मीही होतों आणिक मीही होइन.
त्रिगुणसत्य हें त्रिकालदर्शी
ओघळलें तव अंगावरुनी;
आणिक तें गिळण्यास्तव
चोच उघडली अलगद चित्रलिपीनें, मन्मनांतल्या.

अजुनीसुद्धां नकळत
अनुभूतीच्या आठवणीचा पडतो दाब विलक्षण
अन् फुटतो क्षण.
आणिक नंतर
क्षणांत अद्भुत होतें
अलगद माझेंपण माझ्याशीं येतें.

मुंबई, १-६-५४

# शब्दांची माती झाल्यावर

शब्दांची माती झाल्यावर
मातीला जें सुचतें गाणें
तेंच तुझ्या ओठांवर रुजतें
अडखळती त्यालाच शहाणे.

त्या शब्दांचा अर्थ अगांतुक
अळवांतिल पाण्याला ठावा !
रक्तामधल्या लाल लयीचा
कसा कळावा कुणास कावा ?

—स्पर्शांमधलीं प्रसादचिन्हें—
अवघड त्यांचे गूढ उखाणे.
शब्दांची माती झाल्यावर
मातीला मग सुचतें गाणें.

मुंबई, ४-७-५४

# हात मारितां अपुल्या भाळीं

हात मारितां अपुल्या भाळीं
तिथेंच फुटतो तिसरा डोळा;
आणि उमगतो मुशाफिराला
अंधारांतील देश निराळा.

त्या देशांतिल सगळ्या वाटा
पुन्हा पोचती मूळ ठिकाणीं.
मुशाफिराचे पाय न खळती;
कान ऐकती अपुलिच वाणी.

अर्थ न उरतां क्षितिजाला पण
शापाचाही सरतो ताठा;
हेंच पाहतो तिसरा डोळा :
मुळांत जिरती सगळ्या वाटा.

मुंबई, ११-७-५४

# धैर्य लागतें हसावयाला

धैर्य लागतें हसावयाला
जरी मनाला चढला माज;
हसतां हसतां मध्येंच आंतुन
परक्याचा उठतो आवाज.

धैर्य लागतें पहावयाला
आरशांतलें औरस रूप;
भिजे भावली काचेमधली;
काच खातसे शिळें स्वरूप.

धैर्य लागतें रडायलाहि;
...अश्रूंचें अवसान न पुरतें...
मनूस बुडवुन त्या माशावर
जेव्हां एकच माकड उरतें.

मुंबई

# माझें मला आठवलें

माझें मला आठवलें;
तुझें तुला आठवलें;
दोघांच्याही डोळ्यांमध्यें
जुनें पाणी साठवलें.
जुनें पाणी काळें काळें
तरंगलीं तवंगांत
शिळ्या वासनांचीं बाळें.

माझें मला आठवलें;
तुझें तुला आठवलें;
दोघांच्याही वेदनेला
कुणीतरी दटावलें.
दटावलें कुणी जरी
दुभंगलें जुनें पाणी;
प्रगटली हिमगिरी.

माझें मला आठवलें;
तुझें तुला आठवलें;
नकळत हातांमध्यें
हात गेले; गाठवले.
—सावरला पुन्हा तोल

जरी कळे दोघांनाही
जुनें पाणी किती खोल.

मुंबई, ११-७-५४

# मला टोचतें मातीचें यश

श्रावणांतलें ऊन रेशमी
आकाशाला बांधुन ठेवी
            घट्ट धरेशीं.
सह्याद्रीच्या गळ्यांत पडती
श्रावणांतल्या सरी सराइत
            ओलेत्यानें.
आणि ओणव्या माळालाही
हंबरणारा अवखळ वारा
ढुशी मारतो भलत्या जागीं.
अडचणींतल्या पाउलवाटा
अंग चोरुनी हळूच पळती
माझ्या जवळुन
            मजला टाळुन.
—ब्रह्म जाहलें धरणीला वश;
अशा प्रसंगीं, आंत कुठेंसें
मला टोचतें मातीचें यश.

मुंबई, १२-७-५४

# उंट

क्षितिज नाचलें वाळूभवतीं
        वाळु बरळली, 'नाहीं, नाहीं.'
अशाच वेळीं उंट उगवला;
        आणि म्हणाला, 'करीन कांहीं.'
अन् मानेच्या बुरुजावरती
        चढले डोळे अवघड जागीं;
क्षितिज पळालें दूर दूर अन्
        वाळु जाहली हळूच 'जागी'.
रूप पाहुनी असें अजागळ
        भुललें वाळूचें भोळेंपण;
आणि तिच्या त्या वांझपणावर
        गळला पहिला सृजनाचा क्षण.

उंट चालला वाळूवरुनी
        वाळु म्हणाली, 'आहे, आहे.'
...खय्यामानें भरले पेले;
        महम्मदानें रचले दोहे.
हा यात्रेकरु तिथें न खळला.
        निळा पिरॅमिड शोधित जाई !
तहानेसाठीं प्याला मृगजळ;
        भूक लागतां तहान खाई.
निळा पिरॅमिड दिसला का पण ?
        ...खूण तयाची एकच साधी...

निळा पिरॅमिड दिसतो ज्याला
तोच पिरॅमिड बनतो आधीं.

मुंबई, १७-७-५४

# विलयाची जर वेळच आली

विलयाची जर वेळच आली,
        निदान इतकें असुं दे हातीं—
जिथें तुझें पाउल अडखळलें
        तिथेंच पडुं दे मुठभर माती;

जिथें तुझ्या श्वासांना फुटलीं
    अभिलाषेचीं हिरवीं पानें
तिथेंच जिरुं दे—जिरणारच तर—
        छातीमधलें छिनाल गाणें;

तुझ्या नखांनीं स्वप्न फुटूं दे
        या जन्मांतिल. अन् माझ्यावर
विलयाची जर वेळच आली
        पाप राहुं दे पुन्हां गरोदर

मुंबई, १७-७-५४

## काय गुन्हा तो निव्वळ माझा

आज मनाला मारुन गेला
 लाथ प्रमाथी खारा वारा;
आज बोलला लागट कांहीं
 संध्येच्या दारांतिल तारा.

माड जाहले मुखस्तंभ अन्
 तोंड फिरविलें आज तृणानें;
आज लागतां माझी चाहुल
 हिरमुसलें चोचींतिल गाणें.

आज टाकलें यांनीं वाळींत
 चाफ्याखालिल हें माझें घर.
—काय गुन्हा तो निव्वळ माझा
 श्वासांना नच वास तुझा जर ?

मुंबई, २२-७-५४

# कृपा

मीं न मानिली
अनंतांतल्या दरडीवरची
ती दादागिरि. कडेलोट तो
—मीं न साहिला—अंधारांतिल.
तें मोक्षाचें शुष्क विलोभन
मीं न याचिलें.
या सर्वांवर थुंकुनि गेलों
लाल पिंक मी.

आणि उमगलें
—आज पाहतां वळुनी मागें—
त्या पिंकेवर तुझ्या कृपेचें
इंद्रधनू नव.

मुंबई, २६-७-५४

# गांठ

रक्तक्षयी संध्या
क्षितिजाच्या कठड्यावर तोल सावरीत
झाली अदृश्य—पश्चिमेच्या रुग्णालयांत.
बाकड्यामागील
नारळीच्या पात्या होत्या थरथरल्या
वाऱ्याच्या स्पर्शानें.
ती म्हणाली,
‘ आठ वर्षांपूर्वीं याच नारळीच्या
हिरव्या पात्या होत्या लागत
आपल्या पाठीला ! आठवतात ना ? ’
त्याला आठवलें,
कसे आपण दचकलों होतों
जेव्हां घेतांना हपापलेलें चुंबन
झाला पाठीला पात्यांचा स्पर्श
आणि धसकलें अकल्पित भय
—संवेदनेच्या शिखरावर भटकणारा हिममानव—
‘ होय आठवतें ’
तो म्हणाला, ‘...आणि पाहिलेंस ?
एवढ्याशा नारळीवर केवढाले नारळ ! ’
त्याला नकळतच
तिच्या उणेपणाला झाला स्पर्श
अहेतुक शब्दांचा...आणि नंतर
पदर सावरून तिनें घेतली

## गांठ

रक्तक्षयी संध्या
क्षितिजाच्या कठड्यावर तोल सावरीत
झाली अदृश्य—पश्चिमेच्या रुग्णालयांत.
बाकड्यामागील
नारळीच्या पात्या होत्या थरथरल्या
वाऱ्याच्या स्पर्शानें.
ती म्हणाली,
'आठ वर्षांपूर्वी याच नारळीच्या
हिरव्या पात्या होत्या लागत
आपल्या पाठीला ! आठवतात ना ?'
त्याला आठवलें,
कसे आपण दचकलों होतों
जेव्हां घेतांना हपापलेलें चुंबन
झाला पाठीला पात्यांचा स्पर्श
आणि धसकलें अकल्पित भय
—संवेदनेच्या शिखरावर भटकणारा हिममानव—
'होय आठवतें'
तो म्हणाला, '...आणि पाहिलेंस ?
एवढ्याशा नारळीवर केवढाले नारळ ! '
त्याला नकळतच
तिच्या उणेपणाला झाला स्पर्श
अहेतुक शब्दांचा...आणि नंतर
पदर सावरून तिनें घेतली

प्लॅस्टिकची पर्स सपाट छातीवरील
हातांच्या मिठींत.
'एक विचारूं ?'
ती म्हणाली, 'आपण असें हें
किती वेळ भेटायचें, किती वेळ भेटायचें ?'
'देव व दानव' या सार्त्रच्या नाटकांतील
खुणेचें बोट मागेंपुढें करीत
तो पुटपुटला, 'कुणास ठाऊक.'
थोडासा त्रासलेला, खचलेला, खंगलेला.
ती चिडचिडली,
'तुम्हांला, तुम्हांला.'
आठ वर्षांपूर्वीं त्याच्या ज्ञानाला
असलेली निश्चितता होती विरघळली
परिस्थितीच्या सांडपाण्यांत. त्याला आठवलें
त्यानें केलेलें युद्धाचें महाभाष्य;
बांधलेले आडाखे; भविष्याच्या धुक्यावर
कोरलेले किल्ले...कोसळलेले.
*[ युद्धविरामाच्या चवथ्या वाढदिवसाची*
*एक मिरवणूक होती चाललेली*
*समोरच्या रस्त्यानें; होती पुकारीत*
*शांतीचें साम्राज्य पोलादी आवाजानें. ]*
तेवढ्यामध्येंच
त्याच्या मनाला गेली डिवचून
एक पूर्वस्मृती...दुसरीची;
निखळलेल्या क्षणाची...ज्योतीभवतीं
पिंगा घालणारे ते दिवस
अकालीं खुरटलेले. वेदनेचें वैभव
अवीट, हरवलेलें. "छे, अशक्य,
तें आपणाला नव्हतें झेपणारें;

पण असतें तर...पण असतें तर...
आपली छातीच रुंद असती तर !”
तो हसला आपल्याच मृतात्म्याला.
पुटपुटला मनाशीं, ‘होतें होणारें.’
त्याच्या कपाळावरील दोन आठ्या
होत्या ओलावल्या वैशाखी उन्हाळ्यानें.
‘तुम्हांला’ ती म्हणाली, ‘तुम्हांला.’
लडिवाळ आर्जवानें (अर्थात् घोकलेल्या,
एकनाथ सामंताच्या बरोबर हिंडतांना.
...जर नाथाला नसतें मिळालें
कायमचें कमिशन...तर कदाचित्...
पण कशाला...हलकट.)
‘तुम्हांला’ ती म्हणाली, ‘तुम्हांला.
विसरलांत वाटतें?...युद्ध संपल्यावर...
म्हणालां होतांत...’
‘म्हणालों होतों; कांहीं थोडेंसें
स्वास्थ्य लाभल्यावर, स्थैर्य आल्यावर.
लटक्या रागाचें अवसान आणीत
ती किलबिलली कांहींसें अस्पष्ट,
बटणाशीं खेळतांना. ती खरोखर
कंटाळली होती; कंटाळली होती;
म्हणूनच कंटाळून नव्हतें भागणार
निदान आतां तरी!
*[दोन महिन्यांच्या पगाराइतका*
*बोनस मागणारा मजुरांचा मोर्चा*
*होता चालला गिरणीच्या दिशेनें*
*ठोकीत इन्कि‘लाभ’च्या आरोळ्या...]*
ती फुणफुणली, ‘सांगा ना एकदां
केव्हां संपायचें तुमचें महायुद्ध.’

तो म्हणाला,
'कुणास ठाऊक, कुणास ठाऊक.'
'त्या पलीकडच्या वेड्याला विचारा !'
ती म्हणाली, चमत्कारिक उपरोधानें.
...रस्त्याच्या पलीकडून अर्धनग्न वेडा
चिंध्यांचें बोचकें डोक्यावर सावरीत
होता चाललेला अधिकांच्या शोधांत...
त्याला वाटलें,
कसल्या तरी विराट चक्रांत
आपण दोघें आहों...अडकलेलीं...
आणि काळाच्या खड्या उतारावरून
तें चक्र आहे घसरत,
दिशाहीन, अनिच्छेनें...
इच्छाहीन नियतीच्या प्रचंड प्रवाहांत
त्याला जाणवलें आपल्या इच्छेच्या
भोवऱ्याचें स्वातंत्र्य; जाणण्याचें, न जगण्याचें.
निवडण्याचें, न घडवण्याचें.
त्या जाणिवेंतच
त्यानें काढली प्लॅस्टिकच्या पाकिटांतून
रिट्रेंचमेंटची नोटीस. आजच मिळालेली.
आणि आपल्या बटणाशीं खेळणाऱ्या
तिच्या हातावर त्यानें ठेवला
कागदाचा हुंदका.
त्या दिवशीं
ती परतली न परतण्याच्या इराद्यानें.
घेऊन उराशीं निराशेचें धैर्य;
जेव्हां पाहून भविष्याचा सांगाडा
वितळली मनांतील अनिश्चिताची भीती.
आज प्रथमच तिला गवसलें

## पोसवलेली केळ म्हणाली

पोसवलेली केळ म्हणाली
काय तुला तें?
जेव्हां घेउन आधार तिचा
चुकवलीस तूं पहिली भोवळ.
तेव्हांपासुन
नाहीं हसलीस
हिरवळींतलें
होउन पाणी;
हळवी झालिस सर्व ठिकाणीं;
ओठांवरची पहांट उडली,
गुलबक्षीची.
पोसवलेली केळ म्हणाली
काय तुला तें मौनमोकळें?
जेव्हां दिसला,
मदिरक्षणाचा दुसरा डोळा
वटारलेला अन् अनपेक्षित,
उठतां उठतां.
कळेल का तें?
सत्य भाबडें अनुभवलक्षी,
लक्ष घातला स्वप्नांचा जर?

मुंबई, २८-७-५४

## शपथ तुला

शपथ तुला जवसाची;
गोड छुप्या नवसाची;
शपथ तुला तुळशीची;
भरणाऱ्या कळशीची;
शपथ चंद्रज्योतीची
अन् काळया पोतीची.

शपथ सिताचौरीची;
गौरीची;
शपथ तुला तिळयांची,
रोज नव्या विलयांची,
दीर्घ दीर्घ वलयांची.

शपथ तुला स्वातीची;
समयींतिल वातीची;
शपथ तुला मोहोराची;
शपथ तुला मुरलीची;
खोल खोल श्वासांची
विजनांतिल वासांची.

शपथ तुला अंगाची,
अंगांतिल संगाची;

शपथ तुला रेतीची,
भिजलेल्या;
शपथ तुला मेंदीची,
हिरमुसल्या;
शपथ नजरबंदीची;
त्या पहिल्या धुंदीची.

शपथ तुला तहानेची;
शपथ तुला तृप्तीची;
शपथ तुला,
शपथ तुला,
शपथ तुला सरतीची,
भरतीची.

मुंबई, ८-८-५४

# मुक्तीमधलें मोल हरवलें

मुक्तीमधलें मोल हरवलें;
जेव्हां केलिस
गोकुळांतली पहिली चोरी.
मिसळलास तूं काजळ-काळा,
आणि गढुळलें मी हिम-गोरी.

तुझ्या कृपेचें कृपाण प्यालें
कमळ होउनी; मधुर-डंखसें.
अन् भिजलेल्या पदरामधुनी
गंध सांडला तमपुष्पाचा
तुझ्या अधाशी उग्र नखांवर.

तेव्हांपासुन साठवतें मी
आठवणीच्या परडीमध्यें,
भरदार तुझ्या
छातीवरचें कुरळें पौरुष,
दंडामधली दणकट आशा,
भुवयीच्या त्या दटावणीसह.

मुक्तीमधलें मोल हरवलें
यमुनातीरीं;
शब्द हरवले; बनले मोनी,

तेव्हांपासुन, तेव्हांपासुन
साठवतें मी आठवणींतच
गोकुळांतलें दहि-दुध-लोणी.

मुंबई, ऑगस्ट, १९५४

# आकाशाचें वजन भयंकर

गाडीखालीं रूळहि लवतो
पोलादाचा;
अन् गाडी ही
कांपत जाते अंधारांतुन;
ठिक्करकाळया
अंधारावर आकाशाची
नजर अधाशी—क्षितिजशाखरी.

आकाशाचें वजन भयंकर
अन् आत्म्याची मान कोवळी;
म्हणुनच करतों
क्षमा तुला मी, माझ्या आत्म्या,
क्षमा तुला हे
भेदरणाऱ्या,
हे भ्यालेल्या, भगवंता अन्,
हे मृत्युंजय, हे डरपोका,
हे अमृतार्णव, हे थरकापन्.
लाज कशाची ?
भीतीची जर मायच व्याली
अवघें जीवन;
तरिही त्याचें
मांसहीन मनगट मिरवितसे
अग्निकंकणें दुःखविलासी.

क्षमा तुला हे माझ्या आत्म्या,
पाप-परायण. तुला न शोभे
हरिकृपेचें तें गंगावन,
‘ शांतिमुलायमसुक्तिमोकळें. ’
पुरे पुरे हा आयाल असा
उग्र वेदनेच्याच बटांचा.

प्रणय न अपुला संपेल कधीं.
अग्निकंकणें पिचल्यावाचुन
वैधव्य नसे या जन्माला.

मुंबई, ३१-८-५४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रमांक ८४३५० वि: काव्य
क्रमांक ९८८८ नोंद दि. ११।३।८९१

## शरीर आलें शरण घराला

शरीर आलें शरण घराला.
अन् पोलादी खाटेवरतीं
रात्र पसरली रक्तामध्यें;
आणि अचानक,
पंजाबांतिल त्या जखमेचें
रक्त व्हावलें पायाखालीं.
पुन्हां एकदां,
वक्र मनाच्या निसरड्यांतुनी
दुःख घसरलें षंढपणानें.
पुन्हां उमटली
एक वेदना,
आंखडलेली आणिक थोटी.
काळोखाच्या रुंद कपाळीं
जळती आंठी...
रक्त विसरलें रात्रीला अन्...

परंतु नंतर,
पुन्हां न पहिला सूर्य उगवला.
सकाळ आली शल्य घेउनी,
स्वातंत्र्याची.

मला वाटलें,
स्वप्न कालचें व्यालें, आणिक
आज जन्मलें एक मुकें भय.

मुंबई, १२-९-५४

## किलबिललेलें उजाडतांना

किलबिललेलें उजाडतांना
ओठ उगवतीचा थरथरला
गुलाबलेला ओललालसर.

तुडुंबलेलें
संथ निळेपण
पसरत गेलें चार दिशांना
तांबुसवेडें.

हळूहळू मग निःस्तब्धांतुन
स्वप्नें उडलीं गुलाल घेउन
लालचुटुकशा चोचीमध्यें,
पिंजर-पंखी,
आणिक नंतर
'आप'खुशीनें अभ्र वितळलें,
उरलें केशर
आणि भराभर
उधळण झाली आकाशावर
आकारांची,
रंगदंगल्या.

नाहिं उमगलें
केव्हां सरला रजतराग हा,
ही अस्ताई,
आणि उमटला रौप्यतराणा
झगमगणाऱ्या जलद लयींतिल.
...असा विसरलों, विसावलों अन्
नीरवतेच्या गुप्त समेवर.

आणिक नंतर
न कळे कैशी,
मनांत माझ्या—कांहिं न करतां—
जाणिव भरली कृतार्थतेची.

मुंबई, ६-१०-५४

# पिसाळलेल्या उग्र खुन्यासम

पिसाळलेल्या उग्र खुन्यासम
'आ' वासुन हें ऊन धावतें;
शापदग्धसें,
—माळावरची रेती चघळित
ह'पाप'लेलें पिवळें कुत्रें.

आकाशावर कोड पांढरें
वांझ ढगांचें;
आणिक खालीं
सात गिधाडें
तीर बनविती दक्षिणलक्षी—
वांझपणावर
नकारनक्षी !
काळ थबकतो धापा टाकित
आणि सोडितो एक उसासा;
झडतो तासा
दूर कुठें तरि
कडकतिरकिटा;
आणिक गिळतें शुष्क रितेपण
चराचराला चार मुखांनीं.

'आ' वासुन हें ऊन धावतें;
अन् क्षितिजाची निळी जांभई
फक्त फुलविते,
डोळ्यामधले लाल निखारे.

मुंबई, ११-१०-५४

# हात तुझा तो

हात तुझा तो गोंडस, गुब्रा
तळहातावर ठेवित गेला
एक आठवण
किती जणांच्या ?
आणि अडुकशा ओठावरची
थरथरलाली
किती ठिकाणीं दंशित गेली
हिमवंतांना !
किती जाहली माती पागल
पायाखालीं.

—हें न पाहिलें; कधीं न पाहिन.
जोंवर आहे,
आकाशाची ऊब धरेला;
आणि धरेवर ऊन पसवलें
सर्व ठिकाणीं, सगळ्यासाठीं.

हात तुझा तो गोंडस, गुब्रा
जेव्हां गिळला तळहातानें
फक्त प्रार्थिलें एवढेंच मीं
"हे 'भग'वंता !
आज कोळशाला मिळुं दे वर
पुन्हां पेटण्याचा, जळल्यावर."

मुंबई, ११-१०-५४

# चोळी

स्थळकाळाची भित्री कातर,
धरणारा तो हात भयंकर!
ज्यानें केली
चोविस तुकड्यांची ही चोळी.

चोविस तुकड्यांची ही चोळी
स्तन सावरते म्हातारीचे.
निश्चित जाणा,
गांठ न सुटली अजुनी कोणा!

उंबरठा झिजला ज्ञानाचा;
तरि न गवसला कोणालाही
तो पहिला क्षण.
म्हातारीचा रंग विलक्षण!

बुद्धि बिचारी उसवित बसते
चोविस तुकड्यांची ही चोळी...
अन् म्हातारी
अंधाराच्या मिटक्या मारी!

कधिं न सापडे पहिला टांका,
शिवणारा तो शिंपी बाका;
भित्री कातर.
सूत विजेचें; हात भयंकर!

मुंबई, ११-१०-५४

# उगाच गळतें थोडें पाणी

उगाच गळतें थोडें पाणी
अशाश्वताच्या अवशेषावर;
मानुं नको ही
खूण तयाची.

मोजुं नको अन् त्याची उंची,
पुष्पधवलशा प्रासादांचें
दुभंगलेल्या
पुन्हां एकदां स्वप्न उभारुन.

नकोस समजूं खरेपणानें
टेप वेदनेची वा काढिल
माप गळ्याचें
गुरफटलेल्या.

असेल जर का जाणायाचें,
एक जाण तर :
होणाऱ्याची जळली जाणिव
अशी कुबेरी झालेल्याची
अनुभवली मी.
आणिक नंतर,
कधिं न याचिलीं शंभर टिंबें
आयुष्यावर !

मुंबई, १४-१०-५४

## चित्रगंधा

अन् रंगांच्या अस्ताईंतुन
उठुनी गेलिस
भरल्या वेळीं
झुळुक होउनी झगमगलेली,
पदरपंखशी.
उरलीं मागें
चार पावलें चतुरचोरटीं.
मला वाटलें,
त्या विझलेल्या आठवणीची
मुकी कोंबडी घालुन गेली
निळ्या मनावर
जळतें अंडें.
आणि राहिली चौकट मागें
गगनधरेची,
गिळण्याला मज.

मुंबई, १५-१०-५४

# फूल मुकें राहाणारच नाहीं

कोंब वेळुचे आशावादी,
तर्कट हिरव्या ताठ तुऱ्यांचें;
डोळ्यालाही फोडिल डोळा
असेंच असतें भिंग तुऱ्याचें;
अळवामध्यें असतें आर्जव;
आणि खाज जगण्याची कांहीं;
जरी लपविलें गुपित कुड्यानें
फूल मुकें राहाणारच नाहीं !

शार काजरा गरळ गळ्यावर
गरुडवेलिची मिरवी प्रीती;
अन् पारंबी उरांत शिरतां
थरथरते भिजलेली माती;
सिताचौरिला चैन न पडतें
केस उदविल्याविण अजुनीही;
जरी लपविलें गुपित कुड्यानें
फूल मुकें राहाणारच नाहीं !

खरखरमुंड्या खैराचें तप
पाहुन हसतें गवताचें दळ;
प्रौढ सुरंगीला सहवेना
आसुसलेल्या गंधाची कळ;

रंगदंग तेरडा चिमुरडा
    तीन दिसांना खिजवुन जाई;
जरी लपविलें गुपित कुड्यानें
    फूल मुकें राहाणारच नाहीं !

मुंबई, २३-१०-५४

## पापानंतर

काय तुलाही हें न कळावें ?
पाप्याच्या पश्चात्तापावर
थुंकी गळते अनामिकाची.
काय अजुन ना कळलें पुरतें ?
पापानंतर
पाप्यासाठीं
पापच उरतें.

जिव्हेवरची जुनीच तृष्णा
पुन्हां मागते नवीन पाणी,
पश्चात्तापाच्या करटीतुन.
त्या पाण्यानें जळतें तेजप.
पापानंतर
पाप्यासाठीं
पापाचा जप.

काय तुलाही हें न कळावें ?
[मनांतल्या या 'कंसा'पुढतीं]
कुचकामी ठरतो अघमर्षण;
क्षणाक्षणावर नियतीचा घण;
पापानंतर
प्राजक्ताचें
असह्य दर्शन.

मुंबई, २३-१०-५४

## खडक फोडतो अपुले डोळे

आकाशाचा नेट घेउनी
कभिन्नकाळा, दणकटदंडी
खडक दाबतो पृथ्वी खालीं;
आणि पसरतो वाळूवरतीं
वज्ररुक्षसें छातीचें छत.

या लाटा पण
सरसरत्या, सळसळत्या,
वेडावत, वेलावत,
वळवळत्या,
फुसफुसत्या, धुसफुसत्या,
हुचमळुनी घुटमळत्या,
या लाटा
लटकेपणिं लडिवळत्या; लोटांगणिं कोसळत्या;
...गाल फुगवुनी चूळ थुंकिती...

आकाशाचा नेट घेउनी
कभिन्नकाळा खडक कुढतसे,
पुंगवलेला वृषणहीन पण;
अर्थ पाहतो व्यर्थामधला;
आणि आठवुन शाप पुरातन
पुन्हां चघळतो मुठभर रेती.

या लाटा पण
भुळभुळणाऱ्या,
झुलफुलणाऱ्या,
लपणाऱ्या, लवणाऱ्या, शिवणाऱ्या,
पाघळणाऱ्या,
चुरणाऱ्या रेतीवर झिरणाऱ्या,
झिळमिळणाऱ्या,
टकमकशा पहाणाऱ्या, चकमकणाऱ्या,
गिचमिडणाऱ्या,
पुळणीला अडणाऱ्या,
खडकावर चढणाऱ्या, चढल्यावर रडणाऱ्या,
पुन्हा पुन्हा हुकणाऱ्या, हवें तेंच, हवें तेंच,
अप्सराच
पदर पुढें करणाऱ्या, जलपंखी, या लाटा जळणाऱ्या.

आकाशाचा नेट घेउनी
खडक वाजवी नकारघंटा,
पुंगवलेला, वृषणहीन पण;
दास स्थितीचा.
पुन्हां फोडतो अपुले डोळे;
आणि ओळखुन शाप पुरातन
पुन्हां चघळतो मुठभर रेती.

मुंबई, ५-१-५५

# वाळूंतिल वाळूंतच

टकमकते टिंबदिवे
मावळत्या तेजानें
थिजलेले;
थिजलेलें माझें मन;
दर्याच्या ओठांवर
सुक्तीचें सरलेपण;
कसलेसें हरलेपण.

हिरव्याशा पाण्यावर
वाळूचे रुक्ष हात;
लांब, लांब,
दूर, दूर,
स र प ट ते.

अन् नंतर एक पुढें
अंधाराचें पाउल
संध्येच्या पदरावर
अवजडसें;
अवघडसें;

टकमकते टिंबदिवे.

तळमळता काळा क्षण
रापतसे ओठांवर
कांहिं जुनें, जिरलेलें;
चुरलेली एक स्मृती
वाळूंतिल वाळूंतच.

मुंबई, १४-१-५५

## अनामिकाचा हात अहोरुप

दक्षिणेतुनी उत्तरेकडे
रात्रीं जातें पसरत कांहीं;
आणि जिवावर पडते त्याची
थरथरछाया.

मुकेपणाचा देत इषारा
स्तंभ सरकतो काळोखाचा.

दक्षिणेंतुनि उत्तरेकडे
रात्रीं जातें पसरत कांहीं;
'प्रारंभा'चें स्वप्न आठवुन
काळ गोठतो जिथल्या तेथें
आणि गंजलेल्या दारावर
धडक निराळी.

दक्षिणेतुनी उत्तरेकडे
रात्रीं जातें पसरत कांहीं;
...रक्त भुंकतें लागुन चाहुल
अनामिकाची...
स्तंभ सरकतो काळोखाचा
जरा थांबतो;
वळतो मागें;
आणि संपतें हें सावधपण;

ज्ञान दिशांचें;
फक्त उमगतें एकच तेव्हां :
अनामिकाचा हात अहोरुप
अन् क्षितिजाचें इवलें कंकण.

मुंबई, १७-१-५५

# चिंधी

चिंधी होती कृष्णाआधीं;
चिंधी उरली कृष्णेनंतर;
काळोखाची टिचभर चिंधी
ब्रह्माचें लपवी अवडंबर.
— या चिंधीशीं जपून बोला.
सृजनापासुन सरणापावत
चिंधीचा मिचमिचतो डोळा.

या चिंधीची गांठ सुटेना;
किती ओढली तरी तुटेना;
चिंधी आहे लवचिक मोठी;
चिंधी आहे तळमळणारी;
चिंधी आहे उग्र-इमानी;
धूळ खाउनी धुळींत लिहिते
झालेल्याची नग्न जबानी.

चिंधी आहे घराघरावर,
नग्ननिशाणी ;
चिंधी आहे कुल्ल्यावरतीं,
कंगालांच्या;
चिंधी आहे अन् पाठीवर,
पाठराखणी.
चिंधी आहे बरगड्यांवरी,

बरगड्यांतलें सगळें समजुन;
कधीं न फसली; कधीं न फसते;
फांस लावुनी जुन्या जगाला
नव्या जगावर भुंकत बसते!

हिमाल्यावर चिंधी आहे;
मिसीसिपींतहि चिंधी आहे;
आज-उद्यांची स्वप्न-शिदोरी
या चिंधीची मिंधी आहे.
या चिंधीची जीभ न खळते;
पुन्हांपुन्हां मातीनें मळते;
—कल्पान्तींच्या समईमध्यें
वात होउनी खुशाल जळते.

मुंबई, १९-१-५५

# तीन प्रवासी

विमान आलें डुंवत डुंबत
अंधारांतुन
आणि उतरले तीन प्रवासी
चिंचेच्या अर्ध्या पानावर.

एक म्हणाला,
'आज विसरलों नाक घरीं मी.'
नंतर दुसरा,
'परवां माझें असेंच झालें;
स्वस्थ झोपलों डोळे उघडुन
आणि भावली पळून गेली.'
तिसरा वदला,
'अतां दुधाचा प्रश्न न उरला,
काल नवी मधमाशी व्याली.'

इतक्यामध्यें
अंधाराच्या नाकावरतीं
एक काजवा येऊन बसला.
त्याला पाहुन ते म्हातारे
परस्परांच्या धरुनी शेंड्या
इतके हसले,

इतके चळले,
उरलेल्या अर्ध्या पानांतिल
दवबिंदूंतच ते विरघळले.

मुंबई, २४-३-५५

## हुश्शार

ओठांच्या कांठावर आहे
कुबड काढुनी बसला कोणी
दुडदुडणारे शब्द छबुकडे
लांब लांब नाकानें अडवित.
हुश्शार !

ओठांच्या कांठावर आहे
तर्कपिपासू एकाक्ष कुणी
दंतहीन हिरड्यांनीं चघळित
शुष्क कोरड्या चिद्रूपांना.
हुश्शार !

ओठांच्या कांठावर आहे
कवटीमधला कारिटखावू ;
स्वप्न पाहतां रक्तामधलें
कधीं न देइल पुढतीं जावूं.
हुश्शार !

मुंबई, १९५५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 48340 वि: काव्य
स्वीक 19886 दि 27/3/1991

# उभारलेली

किंचितसे यत्किंचित चाळे,
खांदे हळवे
साधे भोळे,
हळहळचें
अळ मनावर;
आणि अनावर तांबुसताजी,
गौरपणाची गुर्मेबाजी.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
20458

भलत्या वेळीं भाबडकांदी,
नको तिथें अन्
नाकळत्याच्या अंधारावर
ओठपहाटन.
...आणि अंगठा हटेल डावा
पृथ्वीच्या डोळ्यांत खुपसुनी...

अशी एकदां
अनेकदांचें म्हणालीस तूं,
उभ्याउभ्यानें,
उभारलेली...
किंचितसें यत्किंचित कांहीं
आहेच्या नाकावर टिच्चुन.

मुंबई, १८-३-५५

## क्षितिजायितम्

क्षितिजाला नजरेची वेसण
अन् पापाचे सहस्र डोळे,
तेहि मनांतिल!
असें पटविलें परस्परांना...
जेव्हां चढलें अंधारावर
धमनींतिल भरतीचें पाणी;
जेव्हां फुलला गंधशहारा;
आणि घसरलों, अटळपणानें,
हव्याहव्यांतुन होयपणांतच.

अन् त्यानंतर
मंतरलेली
किती वेळ तूं तशीच होतिस
हिरवळींतुनी फिरवित बोटें,
शापित, शापित, सायुज्य तुझें.
किती वेळ मी
तसाच होतों, शापित, शापित,
अस्तित्व शिळें, शून्यविलासी,
फक्त एकटा.

कारण होतो
अशाच वेळीं
रित्या मनाला शून्याचा व्रण;

आणि उलटतें सत्य तयावर
घेउनिया घण...
नजरेला क्षितिजाची वेसण;
नजरेला क्षितिजाची वेसण.

मुंबई, २९-७-५५

## फार फार तर

फार फार तर असशिल हसलिस
अगदीं किंचित
अबोल होउन अनोळखीशी
पदर पोपटी सावरतांना.

फार फार तर असेल बसली
नाकावरती नजर अधाशी
होउन माशी,
चौघांदेखत
चौघां चुकवुन.

असेल दिसलें, फार फार तर
चांदण्यांतल्या खिडकीमधुनी
शुभ्र तुझ्या हाताचें कबुतर
फडफडतांना,
जरा अवेळीं.

फार फार तर असेल इतकें
मृगजळांतलें माफक पाणी!
...आणिक तूं नच पुरी शहाणी;
म्हणुनच कोडें :
मृगजळांतलें माफक पाणी
कसें न झालें मजला थोडें!

मुंबई, ३१-७-५५

## वर्दळवेडी

उगवलीस त्या कर्दळींतुनी
तरी निघालिस वर्दळवेडी;
कशी पसरलिस आकाशावर
ओठामधली कडवट गोडी.

किती भाजले ओठ तरीही
कशी न अजुनी झडली बाधा !
हरलें गोकुळ, हरला कान्हा;
तरी न अजुनी हरली राधा.

मुंबई, ३१-७-५५

# भोवळभोळी

मौन धरावें अडेल ओठीं
अन् बोलावें सर्वांगाहीं;
रीत तुझी ही भोवळभोळी...
मिटून जावें रक्तप्रवाहीं;

मरगळलेलीं फुलें रचावीं
चुरगळलेल्या अंबाड्यावर;
रीत तुझी ही भोवळभोळी...
अन् रेलावें क्षितिजाच्यावर.

रोज रोज क्षितिजावर रेलुन
क्षितिजाची जर झाली चोळी,
...आकाशाचा दोष नव्हे तो...
रीत तुझी ही भोवळभोळी.

मुंबई, १२-८-५५

## जेव्हां आलिस गंधअंधशी

जेव्हां आलिस गंधअंधशी
केसांवरतीं मौन मोहरुन,
इंद्रधनू टांगुनिया उलटें
मीं न तुझें बांधियलें तोरण !

समज यांत तूं सगळें कांहीं—
जरी उद्यांचा चुकला ताळा,
आकाशाची फाडुन चिंधी
पापाचा नच पुशीन डोळा.

मुंबई, ४-९-५५

# उंबरठ्याला शिवुन पळाली

उंबरठ्याला शिवुन पळाली
वाट तुझी ती
पाठराखणी;
आणि तुझें हें पहाटपाउल
पसरत गेलें
घराएवढ्या अंधारावर.

उंबरठ्याला शिवुन पळाली
वाट तुझी ती
—ती फुलझुलती;
हळूहळू अन् घराएवढी
एक मंगळागौर जाहली
तुझ्या स्मितांची
फुलचुफलेल्या.

...दिवस पळाले रात्रीमागुन...
आणिक नंतर,
एक दिवस तर
उंबरठ्याला शिवुन पळाली
वाट तुझी ती
उंबरठ्यासह.

मुंबई, ५-९-५५

# धुक्यांत उठले सरपटशत्रू

धुक्यांत उठले सरपटशत्रू;
धुक्यांत मिटले करपट मित्र;
धुक्यांत आला आणिक गेला
तो जनमेजय; त्याचें सत्र.

फक्त धुक्याचे बनले डोळे;
धुकेंच उरलें फक्त अभंग;
धुक्याधुक्याच्या या सोंगावर
धकामकीचा चढला रंग.

या सोंगाला रंग कशाला?
नका विचारूं; हसतिल गोपी!
धुकें दाखविल हळुच हालवुन
काळोखाची मिस्किल टोपी.

मुंबई, ३·१०·५५

## दुःखच बनलें आज विदूषक

सूख करपलें ओठावरतीं
आणि दुःखहि. फक्त थुकीला
वास राहिला झालेल्याचा ;
फक्त स्मृतीची उरली लीला.

...चिरंतनाच्या ध्यासावरतीं
दांत घासतो जीव कफल्लक...
पुन्हां न येईल धार परंतू ;
दुःखच बनलें आज विदूषक.

मुंबई, ८-१०-५५

## नसांत घुसलें भलतें पाणी

नसांत घुसलें भलतें पाणी
त्या पाण्यांतुन शिरले मासे;
त्यांच्या त्या टकमकडोळ्यांतुन
ओलेता चांदोबा हासे.

आकाशांतिल एक चांदणी
भोवळ येउन पडली खालीं;
नसांत शिरतां भलतें पाणी
त्या पतितेची राधा झाली.

नसानसांतुन फिरली यमुना,
आणिक घडलें भलतें कांहीं :
आज कालिया, राधा, कान्हा
खेळत बसलीं एका डोहीं.

मुंबई, १५-६-५६

# घेता

देणाऱ्यानें देत जावें;
घेणाऱ्यानें घेत जावें.

हिरव्यापिवळ्या माळावरून
हिरवीपिवळी शाल घ्यावी ;
सह्याद्रीच्या कड्याकडून
छातीसाठीं ढाल घ्यावी.

वेड्यापिशा ढगाकडून
वेडेपिसे आकार घ्यावे;
रक्तामधल्या प्रश्नांसाठीं
पृथ्वीकडून होकार घ्यावे.

उसळलेल्या दर्याकडून
पिसाळलेली आयाळ घ्यावी ;
भरलेल्याशा भीमेकडून
तुकोबाची माळ घ्यावी.

देणाऱ्यानें देत जावें;
घेणाऱ्यानें घेत जावें;
घेतां घेतां एक दिवस
देणाऱ्याचे हात घ्यावे !

मुंबई, ११-७-५६

## सनातनी

सनातन तुझे स्तन;
        रंग तुझा काजूपरी;
काज माझ्या जिभेवरी.

सनातन तुझी वाट;
        खिडकीला तिचें पिसें;
माझें दार मला हसें.

सनातन तुझा घाट;
        सनातन 'त्या'ची छिनी;
आणि मीहि सनातनी.

मुंबई, १९५७

## काळेंभेरें

कांहीं तरी काळेंभेरें
　　मनामध्यें डोह सोशी;
जेव्हां तुझ्या घागरीचा
　　ओठ लवे पाण्यापाशीं.

कांहीं तरी काळेंभेरें
　　वारा मनामध्यें झेली;
तुझ्या चोळींतला घाम
　　करी त्याची छाती ओली.

कांहीं तरी काळाभेरा
　　पाथरीला कळे गुन्हा;
जेव्हां घासतेस साडी
　　दुपारची पुन्हापुन्हा.

मुंबई, १९५७

## अशा रेषा-रंगांमध्यें

मुक्या आभाळाच्या खालीं
पांढुरक्या पंख-चोचा
...रेतीमध्यें करकोचा.

दूर अभंग पाण्यांत
किलकिलणारा डोळा;
...वर्तुळांचा चोळामोळा.

हळूहळू क्षितिजाचा
अंधुकाशीं अर्धसंग;
...मऊ रेषा, ओले रंग.

अशा रेषा-रंगांमध्यें
मृत्यूलाहि मिळे घाट;
...पाण्यावर पायवाट.

मुंबई, १९५८

## नाहीं ढासळलें दार

आठवून तुझे डोळे
        वृथा डोळ्यांनीं भरावें;
पहाटेच्या काजव्यांनीं
        तुझ्या केसांत शिरावें

...असे चालले दिवस;
        अशा रात्री ठेचाळल्या;
उंबऱ्याचा भीष्मतट
        कधीं नाहीं ढासळला.

नाहीं ढासळलें दार;
        हाच शेवटचा शाप—
पापी असून असून
        नाहीं घडणार पाप.

मुंबई, ३-५-५८

## खोट्या पैशाचें गाणें

कुणी ठेविला खोटा पैसा
तळहाताच्या धनरेषेवर;
शिवी घातली त्या पैशाला;
आणि टाकला खिशांत सत्वर !

कधीं कधीं तो खोटा पैसा
मनांत शिरतो (हलकट साला);
आणि आजच्या पापासाठीं
सदा उद्यांचा देइ हवाला.

कधीं कधीं तो कविता करतो;
आणि बनवितो छननन छंद;
जुन्याच शाळिग्रामावरती
पुन्हा लावतो नवीन गंध.

कधीं कधीं तो आवेगानें
मुकाच बनतो व्यासपिठावर;
हंगेरींतील 'नाज'वधास्तव
सुरेल रडतो तालसुरावर !

या पैशाची संगत, बाबा,
अशीच आहे अद्‌भुत कांहीं;
खिसा फाटुनी गेला तरिही
खोटा पैसा हरवत नाहीं.

मुंबई, १४-८-५८

## ओंजळींत स्वर तुझेच

ओंजळींत स्वर तुझेच
अन् स्वरांत श्वास तुझा;
क्षितिजाच्या कठड्यावर
कललेला भास तुझा.

ओंजळींत स्वर तुझेच
अन् स्वरांत वेध तुझा;
दबलेल्या इच्छांतिल
स्वप्नांना छेद तुझा.

ओंजळींत स्वर तुझेच
अन् स्वरांत स्मरण तुझें;
डोहाच्या काठावर
वाटेला वळण तुझें.

ओंजळींत स्वर तुझेच
अन् स्वरांत गंध तुझा;
लयवेड्या अर्थाला
फक्त एक बंध तुझा.

मुंबई, ३–९–५८

## म्हातारी

थकलेली अंध रात्र;
शिणलेला एक दिवा;
ताकमेढ फक्त उभी;
परकीशी गार हवा.

म्हातारी निजलेली
शापितसे पायतळीं;
गोधडिच्या चिंध्यांतच
...चाफ्याची एक कळी...

निजलेली म्हातारी
शापितसे पायतळीं;
...घुरघुरत्या भाटीचा
स्पर्श घडे सोनसळी...

थकलेली अंध रात्र;
शिणलेला एक दिवा;
ताकमेढ फक्त उभी;
परकीशी गार हवा.

मुंबई, १९५८

# माथेरान : एक भास

अगा अथांग अथांग
दर्या धुक्याचा दाटला;
दोन डोळ्यांच्या दृष्टीचा
इथें परीघ फाटला.

...अलोटाचे आले लोट...
लाट भासांची उठली;
हटलेल्या सागराची
भुतें मोकाट सुटलीं.

दिशासुद्धां गेल्या दूर;
काल त्यांनाही भेटला.
दोन डोळ्यांच्या दृष्टीचा
इथें परीघ फाटला.

मुंबई, १९५८

# माथेरान : एक आभास

किती दऱ्यांची वासना ;
        किती पहाडांची छाती;
दोन पांगळ्या पायांना
        कशी खुणावते माती.

खूण मातीची कळतां
        पायांनाही जडे पिसें;
...कृतान्ताच्या कड्यावर
        वाटे कांहीं हाललेंसें...

हालणाऱ्या आकारांत
        घुसे कोणी वेडापीर;
अनोळखी धडावर
        ओळखीचें दिसे शीर.

मुंबई, १९५८

# जाऊं नये तेथें गेलों

जाऊं नये तेथें गेलों;
पाहूं नये तें पाहिलें;
आतां पाहिजे निमूट
साहूं नये तें साहिलें.

आतां पाहिजे तोडला
अमृताचा ब्रह्मदेठ;
रोजच्या या पेंडीसाठीं
रोजचीच हवी पेठ.

आतां क्षितीजाला हवें
डोळ्यांचेंहि दिलें दान;
मातीच्या या ओठामध्यें
मातीचाच हवा स्तन.

मुंबई २४-७-५९

## संहिता

: १ :

दिशा किती हें मला ठाउक नव्हतें; तेव्हांपासून
चैत्रांतल्या पालवीसारख्या त्या आठवणी झिळमळता आहेत.
रक्तामधल्या मगरी बनून कधीं पाय ओढून नेतात.
कधीं त्यांना आभाळांतून लोंबत येणाऱ्या सुरवंटाची
खाज असते. कधीं त्यांचा एक विळखा वळवळत असतो
लेअकूनच्या बरगड्यांभोवतीं. कधीं त्यांचेच तुरुंग बनतात; सुरुंग बनतात.
पण तरीही अंधाराच्या रुंद कपाळावर तुझ्या भुवईची
उंच कमान उभी आहे...त्याखालची ही वाट कुठें जाते ?

दिशा किती हें मला अजूनही कळलेलें नाहीं. तरी पण
प्रत्येक दिशेला बुडण्याइतकें पाणी आहे; आणि बुडतांना
धन्यता वाटावी इतकें खोल कुठेंच नाहीं. नाहीं तर पलीकडच्या
अज्ञातांतून एक काळा हात नसता सरसावला
हालवीत अंगठा...पण मी समुद्र खणणार आहें; तुझ्या ओंजळीनें
भरणार आहें; कारण अजून तुझ्या भुवईची उंच कमान उभी आहे.

: २ :

हें अनुभवाचें काजळ डोळ्यांत जिरवून...पुन्हा पहा :
समोरच्या डोंगरावरून सरपटत जाणाऱ्या नागमोडी रेषा

पकडून ठेव. वाहत्या पाण्यावर लसलसणारें कलाबतू,
किलबिलणाऱ्या किरणांचें, घट्ट धर. हिरव्याचोर
पानांच्या चोचींत बोट घालून दंशित हो. हाताच्या रेषा
दूर्वांवर पसरून आपल्या नशिबाची पूजा बांध. ओल्या वाळूंत
रुतून जा, रुतून जा. आकाशावर फेकलेले डोळे
पुन्हा एकदां झेलून घे. मत'लई'बरोबर वाहात जा, नाहात जा.

आणि रस्त्यावरील अभागी जखमांचा वास घेऊन हुंदका...दाब.
याच्या अलीकडे रेती आहे, आणि पलीकडे अंधार आहे.
या तारेवरून तोल सावरीत जपून चल...येणार असलीस
तर पातळ बदलून लौकर चल...जिन्यावरून पावलें वाजण्यापूर्वीं...
माझा खिसा तूं अजून कां शिवला नाहींस ? (असशील ठेवलीस
तेवढीच तुला पळायला वाट !)...जिन्यावरून पावलें वाजण्यापूर्वीं...

: ३ :

तुझ्या वंशवृक्षावरील गूढ गाणीं मला एकदां समजून सांग.
अहिल्येची शीला झाली...इतकी तृप्ती तिला कशानें लाभली ?
प्रकाशाची गांठ सुटतांना इंद्राच्या शरीराला फुटलेले डोळे
कसे चमकले ? आणि धर्माला सहन करणाऱ्या पांचालीचा योग;
पतिव्रता गांधारीच्या जाणत्या डोळ्यांना उमगलेली भीती, बांधलेली;
सीता-लक्ष्मणांमध्यें विरलेलें रामायण, त्यांनाही न उमगलेलें;
तुझ्या वंशवृक्षावरील हीं गूढ गाणीं मला एकदां समजून सांग;
प्रकाश पाहून आंधळें बनण्याचीही आतां माझी तयारी आहे.

माझ्या डोळ्यावर केस पसरून तो प्रकाश लपवूं नको.
हा ध्यास अजून माझा आहे; हें एवढेंच माझें आहे.
रामायण तुझें आहे; आणि महाभारतही तुझेंच आहे.
हें एवढेंच माझें आहे; वळवळणाऱ्या वासनेवरची

प्रकाशाची विषारी फणा मला एकदां पाहिलीच पाहिजे...
अहिल्येच्या शीलाला पाय लावणाऱ्या प्रत्येक रामाचा दगड होण्यापूर्वी.

: ४ :

एक रास रचून मीं आपणाला लपविलें आहे; या राशींत—
फ्रान्समधील 'गुह्य' चित्रें; पेकिंगच्या आदिमानवाचें हसणारें माकडहाड;
प्लँकचा सिद्धांत; बुद्धाचा दांत; नरमेधाचें संस्कारशास्त्र;
जगन्नाथाचा रथोत्सव; हॅम्लेटचीं महावाक्यें; घारापुरींतील त्रिमूर्ती;
नागासाकीचे नग्नांध; फादर डमायनचें महादिव्य;
शेवटच्या दिनोसारनें केलेली धडपड; हिमपर्वांतील जलतांडव;
पोवळ्यांच्या बेटावरील चांदण्यांतील नग्ननृत्यें...आणि प्रस्थानयत्री;
यांच्या सावल्या मिसळल्या आहेत. मीं आपणाला लपविलें आहे.
कुवारपणानें

हसूं नको; एक रास रचून तूंही आपणाला लपविलें आहेस :
पाळण्यावर बांधलेल्या स्वप्नांच्या चिव्‌चिमण्या; संध्याकाळची रामरक्षा;
शेगडीच्या निखाऱ्यावर फुलवलेला हलवा; भिजवलेली भाउबीज
बोचक्यांत लपवलेली; उरलेल्या पिठाची इवलीशी चांदुकली;
हस्तिदंती कंगवा; आणि मंगळसूत्र सोन्यांत गाठवलेलें.
राधे ! या रासक्रीडेंतील मुरली कुठें आहे, मुरली कुठें आहे ?

: ५ :

जेव्हां उघडला विश्वरूपाचा जबडा, जीभ नसलेला,
आणि दांत करकरूं लागले; जेव्हां दुभंगलों, जरासंधाप्रमाणें;
जेव्हां वस्तूंचे आरसे बनले, आणि उलटलीं माझींच प्रतिरूपें
माझ्याच आत्म्यावर...तेव्हां ताकमेढीवर हात ठेवून

तूं पृथ्वीला आधार दिलास; आणि जगाला विकलेले हात
पुन्हा एकदां सोडवून आणलेस. तेव्हां म्हणालीस,
"भविष्याकरितां दिलेली भेट भविष्याला पोहोचती कर."
ताकमेढीवर कललेली ती आकाशवाणी मी अजून विसरलों नाहीं.

तुला उंबरठ्याची शपथ घालून मीं विनविलें ( विसरली नसशील ),
"माझ्या कण्यावर भविष्याचा उग्र भार कशाला ठेवतेस ?
हें चित्र पहा आणि हें विचित्र पहा. हे वास्तविके,
फाटलेल्या आकाशाला टाका घालणारें विजेचें दाभण कुठें आहे ?"
पण हातांतील उसवलेल्या गलुल्याला टीप घालीत तूं म्हणालीस,
"तूं आज 'भाग'लेला दिसतोस; चल आपण फिरायला जाऊं... पूर्वेला."

: ६ :

एकदां आभाळ इवलासा कवडसा होऊन तुझ्या पायाजवळ
गळून पडलें, आणि काळाचा प्रारंभ झाला. तुझ्या तळहातावरील
तांबुस रेषा माझ्या मनगटावर रुजूं लागल्या आणि दिशांचा
प्रारंभ झाला. कां ? कशासाठीं ? हें न कळलेला,
मस्तींत उधळलेला प्रवाही प्रारंभ. त्या प्रारंभांतच मीं अनुभवली
अंताची ओढ, क्षितिजांना सांधणारें यथार्थ अस्तित्व.
आणि रस्त्याच्या दोन्ही बाजूंना स्वप्नें उधळीत
गेलों झेपावत भविष्याच्या दिशेनें, घेऊन अगोदरच अटळाचें दर्शन.

तूं स'बंध'शी राहिलीस मागें; नाहीं झेपावलीस प्रवासाच्या धारेंत.
मला खटकलें तुझें रेंगाळणें, सुखावलेलें, स्वास्थ्याला हपापलेलें...
आणि स्वप्नांची उधळण संपल्यावर रित्या हातांनीं डोळे झाकतांना
बरळलों कांहींतरी. तेव्हां संथ पावलें टाकीत पुढें आलीस,
आणि म्हणालीस, "तूं उधळलेल्या त्या स्वप्नांतील हीं रुजणारीं स्वप्नें
मीं ओटींत पुंजावलीं आहेत; त्यांना तुझ्या समर्थ हातांचा आधार दे."

: ७ :

ऐन काळोखांत ओतप्रोत स्तनांची धमकी देऊन उभें जीवन
'उजाड'विण्याची तुझी शक्ती मीं अनुभवली आहे;
आणि पाकळ्यांतून उमलत जाणारें मौनमत्त लास्य,
त्याची शक्ती मीं अनुभवली आहे; अबोलीचीं फुलें चुरडणारा
मुरडलेल्या ओठांशीं पिळवटणारा राग, हात बांधणारा;
आकारवश इंद्रियांची दुराराध्य बंदीश; अंधारावर ठिबकणारी
वासनेची ठुमरी;
—या सर्वांची अपार शक्ती माझ्या जिवावर कोसळली आहे.
कोसळलों आहें... झेलणारे हातही तुझेच आहेत, झुंजुमुंजूचे.

म्हणूनच मी भयंकराला डोळा घालून पुन्हा परत
तुझ्याकडे येतों. जखमांचीं बिरुदें मिरवीत पुन्हा परत
तुझ्याकडे येतों. मीं अनामिकाला बजावलें आहे,
"तूं मध्यें पडूं नको; 'जीवनाशीं हा माझा प्रेमकलह आहे';
ज्यानें अस्तित्व भोगलें आहे तो निराकाराला भाळणार नाहीं."
कोसळलों आहें...पण झेलणारे हातही तुझेच आहेत, झुंजुमुंजूचे.

: ८ :

तो नेहमींच कोपऱ्याशीं उभा असतो; दुःखामागें दडून असतो.
तो मलाही भेटलेला होता...काशीहून परत आल्यावर...
रस्त्याच्या कोपऱ्याशीं एका पायावर तोल सावरीत उभा होता,
'हसणारा' महारोगी. तो मलाही भेटलेला होता...अजमीरजवळ,
शंकराच्या देवळामागें, आपण छिनलेल्या मूर्तीच्या छातीला
कान लावून हृदयांतले ठोके ऐकत होता; चिंधी लावून
जगत होता, तो शिल्पकार...तो मलाही भेटलेला होता...
आंधळ्यानें दळीत होता...भुकेल्यानें पेरीत होता. उजाडतांना

तो तुलाही भेटलेला होता, नंदूच्या वेळीं...अगदीं उजाडतांना.
पण तूं त्याला ओळखलें नाहींस, हें फार चांगलें केलेंस!
कसा मान खालीं घालून साळसूदसा निघून गेला.
तरी पावलें उमटलीं होतीं; दगडामध्यें रुतलीं होतीं.
पण तूं त्याला ओळखलें नाहींस, हें फार चांगलें केलेंस!
त्याच्या ओळखीच्या जळत्या महामुद्रेपासून तुझ्या तान्ह्यांचें रक्षण होवो.

:९:

...ब्रह्मदेवाच्या देवळासमोरची ती घुमी धोंड तुला आठवते का?
वामकुक्षी करणारी. माझ्या लहाणपणीं तिच्या अंगावर
एक जुईची वेल बावरली होती..."तूं स्टोमध्यें इतकें तेल कशाला
भरतोस?"

...परसूकाकांचीं बोटें झडल्यावर ऐन मध्यरात्रीं दादांनीं त्यांना
दहिभात भरवला, आणि नंतर एक डोली डोंगराच्या आधारानें
भेंडवताकडे घसरूं लागली..."हें हातपुसणें या इथें
खिळयावर टांग म्हणून तुला किती वेळ सांगितलें?"
...ज्ञानेश्वराच्या समाधीचें दार बंद करतांना..."दार उघडेंच आहे;
आंत या."

जें वेंगेत सापडणार नाहीं तें चिमटींत सापडूं शकतें
हें तूं मला दाखवलें आहेस. पृथ्वीमध्यें पाय रोवून
तूं अशीच उभी रहा. आकाशाच्या हुंकाराला तूं खुळ' खुळा'
वाजवून दाखव...दोन माणसांच्या आत्म्यांमध्यें एक मोठी भिंत असते...
तुझ्या बाजूच्या त्या भित्तिचित्रांचें रक्षण कर; आणि मृगाच्या वादळामध्यें
उपळून पडणाऱ्या उद्यांच्या कोंबांना तुझ्या श्वासांचा आधार दे.

## हे ब्रह्मसत्ता !

व्यथेची खपली उचलून ज्यांनीं जीवन पाहिलें आहे
त्यांच्या डोळ्यांची आरती
आज तुला सामोरी येईल.
मूठभर अंधार काय आणि मूठभर प्रकाश काय,
ह्या दोघांनाही कणवेनें भिजलेल्या मुक्या मातीचा
आधार हवा—या श्रद्धेची पाझरती कोरड
तुझ्या गळ्याला पडली होती.
त्या गळ्यामध्यें गिटार होतें.
पण तूं मध्यमावर थांबला नाहींस; आणि कानांच्या भिंती झाल्या.

...अनंतानें हा अवंढा लौकर गिळला...मात्र तूं त्याला
फार लौकर म्हटलें नसतेंस. निघण्यापूर्वींच तूं तेथें
पोहोंचला होतास...तूं लौकर म्हटलें नसतेंस!...
आणि तरीही तुकारामाच्या टाळाचा एक ठोका
आज प्रथमच चुकला आहे; चुकचुकला आहे. हे ब्रह्मसत्ता,
व्यथेची खपली उचलून ज्यांनीं जीवन पाहिलें आहे
त्यांच्या डोळ्यांची आरती
आज तुला सामोरी येईल.

मुंबई, २१-३-५६

# एकट्याच्या भोवतीं रात्र गिरमिटते

एकट्याच्या भोवतीं रात्र गिरमिटते; आणि आढ्याच्या करवतीखालीं
उद्यांचा गर्भ गळून पडतो. एक त्रिशूळ छताशीं रेंगाळतो
आणि छातीवर खूण करून निघून जातो. त्याला हात सामील असतात.
गार गार भयाची लाट खिडकीच्या काचेवर आदळूं लागते,
बिछान्याकडे सरकूं लागते. अशा वेळीं मान मोडून
भिंती दमछाट करतात. त्यांचे डोळे लुकलुकत असतात.
अनामिकाची लांब जीभ गळ्याभोवतीं वळसा घालून वर पाहाते.
एकट्याच्या भोवतीं रात्र गिरमिटते; तेव्हां अंधाराला आकार मिळतो.

एकट्याच्या भोवतीं जग गिरमिटतें; तेव्हां स्वतःच्या हृदयाचे ठोके
स्वतःला ऐकवत नाहींत. जन्मल्यापासून धमनींतून धावणारें
माणसाचें रक्त ज्याला भिऊन पळत असतें, तो आकार
पुढें पुढें सरकूं लागतो; त्याचे ओठ हलूं लागतात;
त्याचे हात रापूं लागतात...आणि कुठेंतरी घंटा वाजते...
जेव्हां दुरून डाफरणारी आगगाडी एकट्याच्या छातीवरून पुढें जाते.

मुंबई, १४-६-५६

## पण हें श्रेय तुझेंच आहे

अंधाराच्या मस्तीवरती रक्ताची गुळणी थुंकून
तूं मातीच्या कुशींत शिरलास.
...ह्याची मांडी मोडूं नका; हा माणूस शेवटपर्यंत उभा होता,
बुडणाऱ्या गलबताच्या डोलकाठीसारखा. ह्याच्या हाताच्या मुठी वळा;
भिऊं नका, त्याच्या हातांतील सर्व घट्टे खास त्याच्याच मालकीचे आहेत.
त्याचें उघडें तोंड हें असें आवळूं नका, पैशाच्या पिशवीसारखें;
मेला असला तरी मवाली आहे...पटकन शिवी घालील !...
आणि असे उपचारासाठीं कवटी फुटेपर्यंत थांबूंही नका ;
ती अगोदरच फुटलेली आहे...
पहा उगवतीला 'फटफट'लें आहे, आणि उद्यांची ताजी बातमी
शाई पिऊन झिंगली आहे.

अंधाराच्या मस्तीवरती रक्ताची गुळणी थुंकून
तूं मातीच्या कुशींत शिरलास;
ती माती तुला विसरणार नाहीं. अन्यायाची निदान अज्ञानाला चीड आहे.
—ह्या शेवटच्या दगडाचा आधार घेऊन एक बुरुज अजून दांत
विचकीत राहील.
तुझ्या अभावाजवळ मी अजून उभा आहें. अंधार आणि अधिक अंधार
यांच्यामधील रित्या रेताडांत डावा पाय रोवून
मी अजून उभा आहें......पण हें श्रेय तुझेंच आहे.

मुंबई, १८-६-५६

## मीं तुला पाहिलेलें नाहीं

मीं तुला पाहिलेलें नाहीं; आणि कदाचित् पाहिलेंहि नसतें...
तुझ्याजवळ भुकेलेले डोळे जिंकून नेण्याची शक्ती होती.
प्रकाशाचा एक भाला तूं छातींत फेकला असतास; उत्तर ध्रुवावरील
हिमगिरी गिळणाऱ्या त्या तुझ्या जळत्या तहानेनें माझा जीव
व्याकुळला असता; मी तडफडलों असतों; धडपडलों असतों;
रात्रींच्या जबड्यामध्यें स्वतःच्या वेदनेची मान देऊन
स्फुंदून स्फुंदून रडलों असतों...पण मला पाय फुटले नसते.
कारण तहानेला डोळा फुटला तरी वेदनेनें पाय फुटत नाहींत.

गीतेनें पाय फुटत नाहींत आणि उपनिषदांनींही पाय फुटत नाहींत;
हीच सामान्यांची शोकान्तिका आहे...डाव्या पायाच्या निरुंद त्रिज्येनेंच
प्रत्येकाला आपल्या जीवनाचें एक अर्धवर्तुळ काढावें लागतें...
तें पूर्ण करण्याची तुझी तहान या घसरड्या मातींत पेरूं नको.
हे असामान्या, मी माझी जखम आज तुझ्यापुढें उघडणार आहें,
आज मी तुला फसवणार नाहीं...
मीं तुला पाहिलेलें नाहीं, आणि कदाचित् पाहिलेंहि नसतें.

मुंबई, ११-७-५६

## तूं गात रहा; गीतांत रहा

तूं गात रहा; गीतांत रहा. ओठावरील पहाटेच्या कांठाकांठानें
वहात रहा; कललेल्या उंबरांच्या कृष्णकुब्ज छाया निरखीत रहा;
तडकलेल्या चंद्राचीं लांबट अर्धबिंबें जोडीत रहा. तिथेंच रहा...
जिथें अर्थ बेहोष होऊन गीताच्या खांद्यावर मान टाकतो;
पानाबरोबर दंवहिरवा होतो; पांखरांबरोबर अुरपंखी बनतो;
नाभीएवढ्या घरट्यामध्यें डोळे मिटून गाढ सुरवाडतो; जिथें शब्द
स्वतःला पाहून स्वतःशींच लाजत बसतात...तें तुझें गाणें
वहात वहात कुठें पोहोचतें हें मला कळलेलें आहे...हे नभभुक्ते!

तूं गात रहा; मी गाजत राहतों. गाणें-गांजणें हातांत नसतें.
या शुष्क डोहांत मेलेल्या कालियाची मेंग मी शोधणार आहें;
...तेवढी खूण मला पुरेशी आहे...
ती सांपडेपर्यंत मला असेंच गाजलें पाहिजे, गांजलें पाहिजे.
मात्र हें निष्फळ समजूं नको (गाजतां येतें त्या अर्थीं आकाश असलेंच
पाहिजे.)
अमृतत्वाकडून मृत्यू मागणारा हा नचिकेत एक दिवस
भरल्या विजेनें तुझ्याकडे येईल...तोंपर्यंत तूं गात रहा; गीतांत रहा.

मुंबई, २९-७-५६

## आज प्रार्थना प्राणाएवढी

ओंकाराएवढा अवाढव्य डोंगर ; तोही हात जोडून उभा आहे.
पृथुल ढगांच्या गुबगुबीत पंखाखालीं...लाललाडके रंग...
आपल्या इवलाल्या चोची खुपसून...मालवले आहेत. पायथ्याजवळचा
एकलकोंडा ताड डोळे अफाटून खाडीच्या पुळणीवरील
माडांचा थवा पाहातो आहे...तोही यात्रेला निघणार आहे...
आज पक्षी आकाशाचे आहेत; आणि आंब्याची कोवळी पोपटपालवीही
आकाशांत उडण्यासाठीं तळमळते आहे...आज प्रार्थना प्राणाएवढी;
कारण देव देवळाएवढा आणि फुलें तींही देवाएवढीं.

अशा वेळीं पुजेसाठीं दहा दिशा पुरत नाहींत आणि मन आपोआपच
अकराव्या दिशेमध्यें पसरूं लागतें; जेव्हां जाणीव भूतकालाचा
श्वास घेत नाहीं आणि भविष्याचा उच्छ्वास टाकीत नाहीं;
अज्ञाताचा पान्हा पिण्यासाठीं प्रकाश पहिल्यासारखा रांगूंरडूं लागतो;
वस्तू आकारांत मावत नाहींत; घाटाच्या कांठावरून उतूं लागतात.

मुंबई, ६-१०-५६

## तिचीं पावलें वाजत नसतात

पोलादी झांजांच्या वांझ आवाजानें झपाटलेले झंजावात...
कुंवार मातीवरील सत्तेच्या रक्तमुद्रा...गुलामांचे तांडे,
ज्यांच्या पाठीवर सूर्याच्या आकाराच्या लखलसणाऱ्या जखमा;
शर्मण्वतीच्या तीरावरील आविक्षितांचे वक्षयज्ञ;
शंखांतून फुंकलेलीं अक्षौहिणी सैन्यें; पोटावर सरपटणाऱ्या
अजगराच्या मानेवरील अजागळ अलेक्झापोलियन;
आणि नंतर बुभुक्षितांचीं भूकयुद्धें.
...उंच कुंचीला मृत्युघंटा बांधून आपला पोर पानिपतावर पाठविण्यापूर्वीं
निदान त्याला विदूषकासारखा रंगीबेरंगी पोषाख द्या !...

इतिहासाचे तीन गर्भपात पानिपतानें गिळलेले आहेत.
छातींछातींतून रुजणारी क्रांती या महाद्वारांतून येत नसते;
तिचीं पावलें वाजत नसतात...
कारण पृथ्वीला गर्भ राहतो तेव्हां आकाश अबोल बनतें.
यापुढें माणसाचें रक्त माणसाकडून सांडणार नाहीं,
अशी पोलादाचीच प्रतिज्ञा आहे. हुजऱ्यासारखे या महाद्वाराशीं रेंगाळूं नका;
महाद्वारानें येणारी क्रांती महाद्वारानेंच निघून जाते.

मुंबई, १-४-५७

# धुमसणारा डावा पाय

धुमसणारा डावा पाय, आणि गर्तेचें एक अंगारगीत
उद्यांच्या, एवढें घेऊन जे भविष्याच्या हद्दीला भिडले;
ज्यांच्या छातींत उद्यांचें वादळ आज अफाटलें
आणि फुफ्फुसें पंखासारखीं फडफडूं लागलीं; आकाशाला
कवटाळीत असतांना ज्यांच्या बरगड्या बरबाद झाल्या;
ज्यांनीं 'असण्या'चा आधार नाकारला; आणि 'होण्या'च्या बेहद्द बेहोषींत
आपली मान आदर्शांच्या फांसाइतकी उंच केली;
जीवनाचा वेध घेतांना ज्यांनीं जगण्याला जुमानलें नाहीं;

त्यांच्या सावल्यांची सोबत ज्या वाटेला पुन्हां लाभेल
ती वाट पुढें जाईल. तिथें विचार पुन्हां एकदां
विद्युतभोगी बनतील आणि अयशही गर्भधीट होईल.
माणसाचें मन स्वतःच्या गतीला बुझणार नाहीं. कुबड्यांच्या
आधाराशिवाय जीवन आपला नवा तोल साधूं शकेल;
आणि धुमसणाऱ्या डाव्या पायाचीं हिंस्र नखें गळून पडतील.

मुंबई, १९५८

## हे माडांनो

रंगीबेरंगी ताबूत ढगांचे; आणि तहान ओठावर.
किती विजनाच्या वाटेवर इपापावें; किती व्हावें
अनावर पांखरांच्या पंखांत मिटून जाण्यासाठीं;
किती पाठीला शिणवावें झालेल्याचें भस्म पुसतांना;
आणि निरभ्र होतांना किती नहावें, फक्त नकारांनीं;
—हें तुम्हांला ठाऊक असेल. म्हणून रेतींत कोसळण्यापूर्वी
तुमच्या मौनाचाच आधार घेऊन मी तुमच्या पायाशीं आलों.
हे माडांनो...पुन्हा एकदां रेतींत रुजण्याची शक्ति द्या.

जियें आपली प्रत्येक कृती हें आपल्या स्वप्नाचें
व्यंगचित्र ठरतें, तें तीर्थ मला सापडलें आहे.
त्या रेतीमध्येंच उभा आहें. निर्वेदांत निगूढ होऊन
एका पायावर एकाच ठिकाणीं उभें राहाण्याचें
अनेकान्तक सामर्थ्य, हे माडांनो, आज फक्त तुमचेंच आहे.
या 'नेति'पुत्राला पुन्हा एकदां रेतींत रुजण्याची शक्ति द्या.

मुंबई, १९५८

## दीपचंदी

रात्रीच्या वळणावरून प्राजक्ताखालीं गंधवती झालीस;
आणि पाळंदीनें एक लहानसें वळण घेतलें; त्या वाटेवर
पुढें कितिकदां ठुमकली होतीस आणि मानेच्या
मंदारमालेंतून दोन फुलें ओघळलीं होतीं.
तेव्हां तुझें तिसरें पाऊल वाजलें नव्हतें;
तें जुईनें झेललें होतें...कशी तऱ्हेतऱ्हेची तृतीया होतीस,
आणि ओठांचा तुरा होता. वरवर पदराची सच्ची होतीस;
आणि रक्ताची लुच्ची होतीस. हुरासुद्धां बावरला होता.
...आंगर ओलांडतांना अल्लडशी अबोली होतीस.
तेव्हां तुझें सातवें पाऊल वाजलें नव्हतें;
तें बकुळीनें झेललें होतें...क्षितिजाच्या वळणावळणांतून
तुझ्या वळणांचा ताण होता; वेलीवरची वेलांटी होतीस;
बाधा पिऊनही साधी होतीस...
तेव्हां तुझें दहावें पाऊल वाजलें नव्हतें;
तें माझ्या उंबरठ्यानें झेललें होतें. कारण मीच उंबरठा होतों.
तुझ्या रेशमी घोळांत गळाभर गद्बळलों होतों. जेव्हां अचानक
केसांमध्यें कवडसे खोवून मुखडा मिरवीत पुढें आलीस;
आणि समेवर केशराची चूळ थुंकून लयफुली झालीस.
...तेव्हां तुझें चौदावें पाऊल दंवानें ओलावलें होतें.

मुंबई, १९५७

## झपताल

ओचे बांधून पहांट उठते...तेव्हांपासून झपाझपा वावरत असतेस.
...कुरकुरणाऱ्या पाळण्यामधून दोन डोळे उमलूं लागतात;
आणि मग इवल्या इवल्या मोदकमुठींतून तुझ्या स्तनांवर
बाळसें चढतें. उभें नेसून वावरत असतेस. तुझ्या पोतेऱ्यानें
म्हातारी चूल पुन्हां एकदां लाल होते. आणि नंतर
उगवता सूर्य दोरीवरील तीन मुतेलें वाळवूं लागतो;
म्हणून तो तुला हवा असतो! मधूनमधून तुझ्या पायांमधें
माझीं स्वप्नें मांजरासारखीं लुडबुडत असतात; त्यांची मान
चिमटींत धरून तूं त्यांना बाजूला करतेस. तरी पण
चिऊकाऊच्या मंमंमधील एक उरलेला घास त्यांनाही मिळतो.
तूं घरभर भिरभिरत असतेस; लहान-मोठ्या वस्तूंमध्यें
तुझीं प्रतिबिंबें रेंगाळत असतात...स्वागतासाठीं 'सुहासिनी' असतेस;
वाढतांना 'यक्षिणी' असतेस; भरवतांना 'पक्षिणी' असतेस;
साठवतांना 'संहिता' असतेस; भविष्याकरतां 'स्वप्नसती' असतेस.
...संसाराच्या दहाफुटी खोलींत दिवसाच्या चौवीस मात्रा
चपखल बसवणारी तुझी किमया मला अजूनही समजलेली नाहीं.

मुंबई, ३०-८-५७

# दादरा

अंग पिणारे डोळे रंगाच्या मस्तीला शरण जातात,
हिवाळ्यांत. डाळिंबीच्या डहाळीवरचा अनोखा पक्षी
उडतांना फुलतो, गैशाच्या गालावरील पंख्यासारखा.
अशा वेळीं दादऱ्यांत मिसळून तुला पितात,
ते माझे ओठ सहा मात्रेचे असतात.
अवेळ झाल्याशिवाय क्षण येत नाहीं; मग वासना
गंधगूढ होते. बेशुद्ध झालेला तुझा खालचा ओठ
माझ्या आकाशांत मावत नाहीं; आणि हिवाळा मोर होऊन
नाचूं लागतो, तुझ्या जिवणीच्या जास्वंदीखालीं.
तेव्हां डोळे मोरपिसे बनतात; तुझा अंधार स्तनाकार असतो;
त्याला ओंजळींत पुंजावणारे तीर्थंकर हात माझे असतात;
तो माझा एकान्त सहा मात्रेचा असतो;
वसंत वृषभासारखा हिंवाळ्याला हुंगीत येतो;
फुलांनाही तुंबलेपणाचें अवसान असतें; पाकळीपाकळीला
असह्य क्षणाचा वास असतो; जेव्हां तुझे
पृथ्वीला गिळणारे नितंब हिरवळीवर हिल्लोळतात...
तुझ्या अभोगीला दादऱ्याची दर्दभिठी हवी असते.

मुंबई, १९५७

## झुमरा

गगनगंभीर डोह...आणि तिरावर शैलशृंग गोपूर...
चौदा विद्यांच्या चवल्या जिच्या पाण्यांत विरघळतात
ती तृष्णेवरून वाहाणारी कृष्णा—तिला हवी तर भक्ति म्हणा—
जिथें थबकते;...तें परंधाम, प्रमाणांच्या पलीकडील,
प्राणामध्यें मिटलेलें...तें ईशावास्योपनिषद्,
उंबराच्या पानावरील रेषांखालीं लिहिलेलें,
जिथें बुडून वाचतां येतें...तो गगनगंभीर डोह;

कालाचें कौतुक करून कालातीत होणारा मृत्युगोचर जन्म;
प्रज्ञानाच्या उंबरठ्यावर कोलमंडणारा कमंकल
मुठीएवढा—त्याला हवा तर प्राण म्हणा—प्रकाशानें
किती भरला तरी 'हर'त नाहीं; आणि आर्तांचें
अनादी तीर्थ किती प्यालें तरी सरत नाहीं;
म्हणूनच केवळ ती आप्राणब्रह्म प्रार्थना जिथें
शब्दसह्य होते, तो प्रारब्धान्तक गगनगंभीर डोह.

मुंबई, १९५७

## रूपक

ती अर्धीमुर्धी रात्र, स्वप्नधीट,
...तिचे त्रिदळ नेत्र; गात्रगुंफा
चांदण्यानें चिंब चिंब...या अशा
निसुळत्या क्षितिजाच्या पाटामधून
तिच्या रूपाचें पाणी; चंद्रबिंब
निंबांत विरघळतें...तें अकालकर्म,
जेव्हां आरक्त अंधार प्रथमच
रंध्रारंध्रांतून वाहतो, प्रकाशवेडानें
आणि खिडकीचे सात गज खट्टू होतात...

ती अर्धीमुर्धी रात्र, स्वप्नधीट.

मुंबई, १५-१-५८

## आडाचौताल

धीरोदात्त घाट; पायथ्याची पहाट; आणि करवतीसारखें
उग्र आकाश...ह्यांच्या चिमटींत पापण्या सापडतील
तिथून आडवाटेला आरंभ होईल. डोंगरसुद्धां तिला पाहून
नाक मुरडील; दोन कड्यांच्या जबड्यांत भरडील...कदाचित्,
...पांचव्या पहाडाच्या उतारावरच शून्याच्या आकाराचीं
दोन पावलें तुला उमगतील...तो पहिला काल समज...
मात्र तुझ्या बोलघेवड्या हिरड्यांना अजून दांत फुटले नसले
तर भिऊं नको...त्या पाउलपाण्यांतच इवलाल्या होड्या सोडून दे
लक्ष लक्ष. पुढील घाट बिकट आहे; दक्ष रहा; दक्ष दक्ष...
...नवव्या पहाडाचें माकडहाड ओलांडताना आपली टांग
आकाशाइतकी उंच उचल...तो दुसरा काल समज...
तिथें एकदां आपल्या जिगीषेला हसून घे. कारण तिथेंही
हिममानवाच्या खोल पावलामध्यें आरशाइतकें पाणी मिळेल.
त्यांत आपलें विरूप पहा; सबंधसें कबंध पहा...
मात्र शिवलिंगाचा आधार असेल तर त्यालासुद्धां भिऊं नको.
...तेराव्या पहाडावर एक हाडांनीं काढलेलें स्वस्तिक दिसेल!
तोच शेवटचा काल समज...शिवाशिवाच्या या संगमावर
उरलीसुरली चौदावी समिधा समर्पण कर. आड सोडून
नागडा हो...त्याच्या नजरेला नजर भिडव...
धीरोदात्त घाट; पायथ्याची पहाट; आणि करवतीसारखें
उभें आकाश...हीं पापण्यांच्या चिमटींत एकदम सापडतील
तेव्हांच आडवाटेचा अंत होईल.

मुंबई, १९५८

# आदिताल

वल्कलें वडावर ठेवून चौखूर टाकीत मी प्रथम
तुझ्याकडे आलों; तेव्हां पहाडाला पाठीशीं घेऊन उभी होतीस;
तो पहाडही नग्नभग्न होता, वृषणमत्त वृषभासारखा
मातीमध्यें शिंग खुपसून...तेव्हां फक्त आदिताल होता.

कैलासलेण्यांतील स्तनमग्न लयीनें उजळलेल्या अंधारांत
दगडांची नाडी धडधडत होती. त्या दगडांनाही सुरताचा
वास होता. त्यांच्या श्वासांनींच कोपऱ्याकोपऱ्यावर थबकलों होतों
पुतळ्याप्रमाणें, रुद्धरक्त रुद्धश्वास...तेव्हां फक्त आदिताल होता.

चौऱ्याऐंशीं लक्ष आवर्तनांतून हाच आदिताल वहात असतो.
कधीं त्याच्या प्रवाहावर बोधिवृक्षाची छाया पडते:
कधीं त्याच्या धारेमध्यें एक क्रूस धुतला जातो;
कधीं लय ठाय असते, जन्ममृत्यूच्या अंतराइतकी.

समेचें सोंग घेऊन अर्ध्या वाटेवर उभ्या असलेल्या त्या कालाला
भिऊं नको. आदितालाच्या अटळ समेमध्येंच शेवटीं सर्व ताल
समाधी घेतील...द्वाडपणानें आड जाऊन फिरत फिरत
पुन्हा परत शरण येतील...प्रत्येक समेला तुझ्या
'हो'काराचा आधार असो.

मुंबई, १९५८

# वाजवितां वाळा । मिठी घाल

जगाच्या समोर । नाकारितों नातें
म्हणोनियां, माते, । नको राग.
तुझिया राउळीं । मान वाकवीतां
म्हणतील होता । अजागळ.
सांगतों तयांना । 'ठेंच गा लागली
म्हणोनी वाकली । खालीं मान.'
सांगतों, 'आवडे । देवळाचें रूप.'
शोधितों स्वरूप । वेगळेंची !
सांगतों, 'लागला । मृदंगाचा नाद.'
अंतरांत साद । अनंताची.
पुन्हा पुन्हा येतों । परतून मागें;
ओढ कशी लागे । मीच नेणें.
चोरटें हें प्रेम । चोरटा हा चाळा;
वाजवीतां वाळा । मिठी घाल !

## सद्‌गुरूवांचोनी । सापडेल सोय

करितों आदरें । सद्‌गुरुस्तवन
ज्यांनीं सत्यज्ञान । वाढवीलें.
धन्य पायथॅगोरस् । धन्य तो न्यूटन
धन्य आइन्स्टीन । ब्रह्मवेत्ता.
धन्य पाश्चर आणि । धन्य माझी क्युरी
थोर धन्वंतरी । मृत्युंजय.
धन्य फ्राइड आणि । धन्य तो डार्विन
ज्यांनीं आत्मज्ञान । दिलें आम्हां.
धन्य धन्य मार्क्स । दलितांचा त्राता
इतिहासाचा गुंता । सोडवी जो.
धन्य शेक्स्पीअर । धन्य कालिदास
धन्य होमर, व्यास । भावद्रष्टे.
फॅरडे, मार्कोनी । वॅट, राइट् धन्य
धन्य सारे अन्य । स्वयंसिद्ध.
धन्य धन्य सारे । धन्य धन्य मीही !
सामान्यांना कांहीं । अर्थ आहे !
सद्‌गुरूंच्या पाशीं । एक हें मागणें :
भक्तिभाव नेणें । ऐसें होवो.
सद्‌गुरूंनीं द्यावें । दासा एक दान :
माझें दासपण । नष्ट होवो.
सद्‌गुरूवांचोनी । सांपडेल सोय
तेव्हां जन्म होय । धन्य, धन्य.

# कांहीं केल्या आतां । मोक्ष हा टळेना

‘ मी ’च्या वेलांटीचा । सुटो सुटो फांस;
जीव कासावीस । सत्यासाठीं.
सत्यसंशोधन । अगा गोड आग;
नाहीं झोप-जाग । मुमुक्षूला.
स्थळांतील सत्य । दावितें वाकुल्या;
क्वांटुमची लीला । आकळेना.
काळाच्या चक्राची । गती विलक्षण;
दिशेचेंही ज्ञान । कळों नेदी.
स्थळ-काळ यांची । विश्व ही फुगडी;
दोघेंही नागडीं । झपुर्झांत.
गतीच्या अनंतीं । स्थितीचा आभास;
घटनेचा ऱ्हास । क्षणोक्षणीं.
समतत्त्वभावी । सर्वांचा शेवट;
तरी कटकट । करी आत्मा !
‘ थर्मोडायनॅमिकल् । इक्विलिब्रियम ’
आतां म्हणा ‘ मम ’ । मोक्षासाठीं.
कांहीं केल्या आतां । मोक्ष हा टळेना !
याविना कळेना । दुजें सत्य.

## मातीचे हे कण । हसताती

जडाच्या झाडाला । जीवनाचें फूल;
सुटे परिमळ । जाणिवेचा.
जाणिवेला झालें । आपलेंच ज्ञान
आणि आत्मा जाण । जन्मलासे.
ऐसा आत्मा बोले । 'जडाची मी आई';
याचें नांव पाही । अहंकार !
विश्वाचा अश्वत्थ । दिसे ऊर्ध्वमूल !
सूक्ष्म आणि स्थूल । भिन्न वाटे.
गुण आणि मान । याचें संवादित्व
किंवा क्रांतितत्त्व । आकळे ना.
'आहे' आणि 'नाहीं' । एके पिंडीं नित्य
नांदती हें सत्य । कळों नेदी.
विरोधाचें चुरे । विकासाशीं नातें;
आणि बुद्धि होते । भ्रांतचित्त.
भूत-भविष्याचा । सरे ताळमेळ,
अज्ञेयाचें बळ । वाढों लागे.
अहंकार जाई । अज्ञेया शरण.
मातीचे हे कण । हसताती !

# आतां मला कळ । सोसवेना

इच्छा आणि ज्ञान । जेव्हां एक होती
तेव्हां मिळे मुक्ती । जाणिवेला.
इच्छा देई शक्ति । ज्ञान देई डोळे;
मागे जें जें मिळे । अन्य नोहे.
ज्ञान बांधतें नी । सोडतेंही ज्ञान;
ज्ञान हें कारण । स्वातंत्र्याचें.
'स्वातंत्र्याची सक्ती । सक्तीचें स्वातंत्र्य';
कळे गूढ मंत्र । ज्ञानियांना.
ऐशा जाणिवेचें । विश्व होई घर;
तेव्हां विश्वंभर । रूप पावे.
मींच घडायाचें । माझें देवरूप;
वर आणि शाप । माझे हातीं.
ईश्वर लेकरूं । मानवता आई;
खेळावया देई । सर्व शास्त्रें.
मोडतोड करी । खेळतांना तान्हा;
आटेल का पान्हा । वात्सल्याचा ?
आज बाळकृष्ण । रांगे, पडे, रडे,
बोलतो बोबडें । असंबद्ध.
विठ्ठला, विठ्ठला । पुरे पोरखेळ;
आतां मला कळ । सोसवेना !

## अगा माझ्या देवा । साधलीस वेळ

अगा माझ्या देवा । साधलीस वेळ
देखोनियां कळ । दुःखिताची!
नाकारिलें तेंच । आलें आकारास;
तुवां केला घास । सर्वस्वाचा.
दावोनियां मला । मृत्यूचें हें भय
साधलीस सोय । प्रार्थनेची!
भिववोनी मला । लवविली मान
आणखी पाषाण । पूजवीला!
विजेच्या जिभेनें । विचारिलें 'काय';
म्हटलें मीं 'होय' । कांपतांना.
दाविलेसी उग्र । महारोग, क्षय,
वदविला 'जय' । आपला त्वां.
निराशेचें वज्र । हाणोनियां माथां
तुझी सर्व गाथा । लिहविली.
(चरकांत चाले । हळहळू ऊंस
भक्तीचा हा रस । गळों लागे!)
शरण मी बापा । शरण, शरण,
तुझाची चरण । मानेवरी.
दुःख हें शरण । देवा, मी न बद्ध;
आत्मा स्वयंसिद्ध । सुखापोटीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
काव्य
१८४३५०

## पाठ आणि पोट । यांचा झाला टाळ

विठ्ठला, विठ्ठला । भाकरी गा होई;
पोटामध्यें येई । शांतवाया.
आम्ही भुकीं पोरें । सैरावैरा धावूं,
एकमेकां खाऊं । धन्य माया!
आम्ही भुके जीव । देतसूं इशारा:
आमच्या पुढारा । नको येऊं.
विठ्ठला, विठ्ठला । आम्ही अन्नभक्त;
आम्हां देवरक्त । वर्ज्य नाहीं!
ऊठ ऊठ विठ्या । दाव देवपण;
नाहीं तरी घण । तुझ्या माथीं.
माझ्या पोटीं भूक । तुझ्या पोटीं माया;
मग हा कासया । गदारोळ?
पाठ आणि पोट । यांचा झाला टाळ;
अभंगाचें बळ । अमर्याद.

## ज्यानें केलें पुण्य। त्यानें केलें पाप

ज्यानें केलें पुण्य। त्यानें केलें पाप;
दोघांचाही बाप। तूंच तूंच.
ज्यानें द्यावा जन्म। त्यानें मृत्यू द्यावा;
काय तुझा कावा। तुला ठावें!
कार्यकारणानें। बांधलें सकलां
सूक्ष्मांतील कला। तुझ्या हातीं!
नाकारितां तुला। तूंच बोलविशी;
काय माझ्यापाशीं। माझें ऐसें.
अरे, माझी इच्छा। तीही तुझी दासी;
वृथा फसविसी। कशासाठीं?
फसवी ही इच्छा। निष्ठेचें हें ढोंग!
अंतरींचा रंग। तुला ठावें.
हाय हाय झाली। सर्वस्वाची चोरी;
निजला रे हरी। हिच्या संगें.
...बरें केलें देवा। सुटला हा पाश;
होतां सर्वनाश। नाश नोहे!

## आहे हा जिव्हाळा । जागृताचा

अमृत जेविला । अमृत आंचवला;
फक्त दुपारीला । आज नाहीं !
हसण्यांत माझ्या । रडण्याची कळ;
थुंकींत गरळ । कालियाचें.
आपण मरेना; । मरण्या न देई;
भविष्याची घेई । मुखीं आण;
जगण्याची निष्ठा । हाचि माझा सूड;
खाईन ' ओसाड ' । तयासाठीं.
देखोनियां दुःख । मन मावळलें;
आणि आवळलें । ' लाल ' लोह.
लाल आलिंगनीं । दुःखें लाल नवीं;
त्याची चिंता हवी । पुढच्यांना !
पुढच्यांच्या साठीं । जगतों मी आज;
ऐकतों आवाज । गर्भवासी.
संतांचें संतान । रक्तमुद्रा आला;
आहे हा जिव्हाळा । जागृताचा.

## विज्ञानाचा द्रोह । हीच माया

बदलतें विश्व । बदलतें मन,
बदल लक्षण । जीवनाचें.
बदलतें जग । बदले समाज;
बदलतो साज । संस्कृतीचा.
बदलाला लागे । वाढण्याचा अर्थ;
तेथें परमार्थ । सिद्ध झाला.
सत्य आणि मन । विश्वाचींच अंगें;
गतीच्याच संगें । वाढताती.
अहंकार म्हणे । माझें मन स्थीर
बाकी चराचर । वाहतसे.
सांपडेना सत्य । ऐशिया विचारें;
शाश्वताचें वारें । शिरे कानीं !
डहाळीला शापी । लोंबणारें फळ;
म्हणे अमंगळ । अर्थ-काम !
अनंताचें प्रेम । शाश्वताचा मोह;
विज्ञानाचा द्रोह । हीच माया.
माझा पांडुरंग । पंचेंद्रियरूप;
त्याला प्रिय धूप । वासनेचा.

# आशीर्वाद द्याया । हात उंच

विश्वाचा हा घोडा । आडदांड झाला;
ब्रह्माच्या खुंटाला । आवरेना.
तुला ना आवरे । तुझेंच हें घोडें;
आज सुटे कोडें । मला सारें !
ठोकीन तयाला । इच्छेची वेसण;
माझें देवपण । दाखवीन.
अणूंतील विश्वा । दिलें मीं स्वरूप;
विश्व अणूरूप । कां न व्हावें ?
चालवूं दे मला । जरा माझा जोर;
थोर विश्वंभर । शिणलासी !
आजवरी विठ्या । तुजला पूजिलें;
आज तुवां फुलें । उधळावीं.
विठ्ठला, हीं नाहीं । स्वप्नांतील गाणीं;
आकाशींची वाणी । वृथा नोहे !
अगा सर्वेश्वरा । पड माझ्या पायां;
आशीर्वाद द्याया । हात उंच !

## येतसे फाटकें । कुल्यावरी

होतां अंतर्मुख । दिसे अहंभाव;
वाटतें स्वभाव । बदलावा.
म्हणतों इतरां । 'शहाणे', 'शहाणे';
माझें मात्र 'उणें' । दाखवून.
शिकवितों मना । थोडे शिष्टाचार;
थाटतों व्यापार । साखरेचा.
लीनपण याया । मोडीतसें मान;
मोडणारें मन । मोडेचना.
बदलाया मला । 'मी'च धडपडे;
त्यानें जाती तडे । आहे त्याला.
धडपडे जीव । कराया नेटकें;
येतसे फाटकें । कुल्यावरी.

## सद्गुरूची मेख । सुवर्णाची

सकाळीं उठोनी । निजवावें मन;
बनावें सज्जन । शिष्टाचारें.
भूदेवांना द्यावी । टाळींतून लांच;
दहा आणि पांच । गाठवावे.
गाठीमध्यें कांहीं । गोठवावा त्याग;
वठवावा राग । सात्त्विकांचा.
निंदावें, वंदावें । पाहोनियां वेळ;
त्यांचा ताळमेळ । बँकेपाशीं !
ताठा सोडोनियां । ताणावा पदर;
आणावा आदर । ओठावरी.
'देणारा तो देव' । साक्षात्कार रोख;
सद्गुरूची मेख । सुवर्णाची !

# अंधाराची कूस । हुंदक्यानें भरे

मूर्तीच्या माघारीं । मुर्दाड दडले;
म्हणोनि फोडिलें । फत्तरांना.
भगवे नेसले । नागड्यांचे काळ;
म्हणोनी गरळ । थुंकलों मी.
दांभिकांच्या पुढें । वळली म्यां मूठ;
ओरडलों झूट । झूट सारें.
जगविण्या पोर । मारियला बाप;
स्वीकारले शाप । सज्जनांचे.
झालों कानफाट्या । प्रेमळा परका;
लाभला चरका । चांगल्यांचा.
अंधाराची कूस । हुंदक्यानें भरे...
—तुला तरी सारें । सांगावें का?

## मातीला या भेगा । नको पाडूं

समर्थांचें स्वप्न । सत्याहून ताठ;
सामान्याची पाठ । ओझ्यासाठीं.
स्वप्न आणि सत्य । दोहीकडे दोन;
माझ्यासाठीं स्थान । त्रिशंकूचें.
मनाचें हें दुःख । मनामध्यें मावो;
निदान ही गावो । तुझी खूण!
माझ्यावरी मीच । मारतांना लाथ;
विजेचा तो हात । नको मध्यें.
मागणें न लई । माझें मला देगा;
मातीला या भेगा । नको पाडूं.

# घ्यावें सर्व नाणें । वाजवोनी

आम्ही द्रव्यदास । मनाचे मवाळ,
देतसे गोपाळ । दूध-लोणी !
वैकुंठींची पेठ । हवा पैका रोख;
किरकोळ ठोक । मिळे मोक्ष.
लज्जा सांडोनियां । मांडितां दुकान,
येई नारायण । उधारीला !
येतो नारायण । बघण्यास सत्त्व;
रोखीचें तें तत्त्व । सोडों नये !
तुटतां आंतडें । पाहोनियां झोळी;
अवस्था धाकुली । म्हणों नये.
उसासा करावा । थोरांचा उंबरा;
आणावे ते घरा । विघ्नकीर्ती.
अवघाची संसार । सुखाचा करावा;
आनंदें भराव्या । सर्व बँका.
सिद्धांतींचें वर्म । अनुभवी जाणे;
घ्यावें सर्व नाणें । वाजवोनी !

# सज्जनाचें बळ । पायामध्यें लुळें

सज्जनाचें बळ । पायामध्यें लुळें;
ब्रह्म झालें बुळें । प्रपंचांत.
सर्वांही उपायें । शांतवावे खळ;
तेची खळखळ । करताती.
सज्जन तो काय । करील वाकडें ?
चोरील लाकडें । स्मशानीं का ?
सज्जनास द्यावा । त्याचा सेवाधर्म;
दुर्जनाचें कर्म । दुर्जनास.
दंशिणारा दांत । सोन्यानें भरावा;
वैकुंठींचा रावा । वैकुंठांत !
भले तरी व्यावी । कासेची लंगोटी;
नाठाळाची काठी । चुकवावी.

# मानवांचें सारें । माकडाच्या हातीं

संस्कृतीला झाला । नफ्याचा उदर;
प्रकाशाचें पोर । कुजे गर्भी.
स्वातंत्र्याला झाला । स्वार्थाचा हा क्षय;
नागड्यांना न्याय । मिळेचना.
मानवांचें सारें । माकडांच्या हातीं;
कुलुपेंच खाती । अन्नधान्य.
जगाचे पोशिंदे । भुकेनें भाजती;
आणखी माजती । मधलेच.
मानवाचें आतां । मानवा मिळूं दे;
ना तरी जळूं दे । विश्वगोल.
जळतांना जळो । निदान ही भूक;
प्रार्थना ही एक । करा आतां.
नागड्यांनो उठा । उगवा रे सूड;
देहाचीच चूड । पेटवोनी.

## का रे नाडवीसी । आपुल्या मनासी

का रे नाडवीसी । आपुल्या मनासी;
पोषितो कुणासी । जगीं कोण ?
महारोग्यापोटीं । पोरांचीं खिल्लारें;
जीवन तया रे । कोण देतो ?
कोणें केली बाळा । दुःखाची उत्पत्ती ?
वाढवी श्रीपती । पाप-पुण्य !
कोणी दिली भूक ? । कोणें दिले रोग ?
दारिद्र्याचे भोग । दिले कोणीं ?
दुःखाच्या अनंता । भोगितो संसार;
येई भागाकार । आत्मरूपें.
आत्म्याचें हें गुह्य । ब्रह्माला ना ठावें;
त्याच्या वंशा जावें । तेव्हां कळे.
जन्माच्या प्रश्नाला । मृत्यूचें उत्तर;
देई विश्वंभर । दुजें काय ?

## समर्थांच्या हातीं । जन्ममृत्यू

मालकांचा देव । मालकांना पावे;
आम्ही फक्त व्हावें । अन्नभक्त.
पोटाच्या हातांत । आत्म्याचा पतंग;
स्वप्नांचे हे रंग । शेपटाला.
अगा स्वातंत्र्याची । पोटांतून वाट;
बाकी काथ्याकूट । सफेदांचा.
पिंजऱ्यांत पक्षी । स्वातंत्र्याचीं गाणीं;
बोलवीता धनी । वेगळाची !
अगा कशासाठीं । भविष्याची भाषा;
संस्कृतीचा गोषा । हिजड्यांना ?
रोज माझा जन्म । माझा मृत्यू रोज;
उद्यां आणि आज । असंबद्ध.
आम्ही, तुम्ही सर्व । माणसें नी माती;
समर्थांच्या हातीं । जन्ममृत्यू.

## अगा कृपावंता । आवर हें दान

पायांतील कांटा । पायासह गेला;
ऐसा हा भेटला । धन्वंतरी.
दुःखासह गेला । घेवोनियां सुख;
भूक आणि मूख । सवें गेलीं.
प्रार्थियलें काय । काय दिलें हातीं;
मातीवर माती । वाढलीस.
रितेपण माझें । चघळतें रेती;
मोत्यांसह स्वाती । सांजावली.
ऐसें मुंडलेंसी । गुंडांच्या गोपाळा;
स्वतः निराळा । राहोनियां.
सुखदुःख छेद । परस्परां गेले;
गणीत राहिलें । शून्यलब्धि.
अगा कृपावंता । आवर हें दान;
टाक तें निदान । दुःख माझें

## दैत्यांचें या भय । भय देवांचेंही

कालसर्प चाटी । जिभेनें सर्वांग;
विषाचा त्या रंग । जीवनाला.
जन्मा आधीं जन्मे । अगा माझें भय;
ऐसा तूं सदय । विश्वकर्मा !
आकाशाचा पेला । लावोनियां ओठीं
पाजलीस गुटी । भयाचीच.
जगतांना भय । भय मरतांना;
भयाचाच पान्हा । सोडिलासी.
भय इतरांचें । भय माझें मला;
भयाचाच झाला । स्वर्ग, मोक्ष.
आम्ही भयभीत । भयाचीच वीण;
भयापुढें लीन । भयरूप.
दैत्यांचें या भय । भय देवांचेंही;
भय याचि देहीं । याचि डोळा.

## विटेवरी उभा । खिशामध्यें हात

आपण 'संत' हें । संतां ना कळावें;
एरवीं फळावें । ब्रह्मज्ञान !
तिठ्यातिठ्यावर । संत आणि भाट;
सत्याचीच वाट । ओसाडली.
सत्तेपुढें बुझे । सात्त्विकांची वाणी;
नागडा पाहोनी । बने धीट.
नागड्यांच्यासाठीं । निस्संगाचें ज्ञान;
मुक्यासाठीं मौन । सांगो लागे.
उपाशांना सांगे । उपासाचें व्रत;
ऐसा हा वेदान्त । वांझ झाला.
विटेवरी उभा । खिशामध्यें हात;
अध्यात्माचें शीत । ओठावरी !
निर्वाणीचा शब्द । शोभावा मुखांत
ऐसा कोणी संत । सांपडेना.

## आधीं केली मतें । मग केला नर

आधीं केलीं मतें । मग केला नर;
अंतरीं हें सार । साठवावें !
कोणी तत्त्ववेडा । मरो सत्यासाठीं;
त्याचें नांव ओठीं । 'मत' वावें;
हुतात्म्याचें घ्यावें । सदा मुखीं नांव;
बाजारांत भाव । वाढवावा.
मूल्याचीच कढी । मूल्याचाच भात;
घालावा मुखांत । सात्त्विकांच्या.
राजसांना द्यावी । कांहीं द्रव्यस्थानें;
तामसांना अन्नें । तोषवावें.
पंचमहाभूतें । पंक्तीला असावीं;
मिठांत दिसावी । मतपेटी
विंदा म्हणे आहे । विज्ञानाचें बळ;
सांपडेल कळ । कुलुपाची !

## अव्यय तें एक । सांडलें गा

अगा क्रियापदा । केव्हां येसी भेटी;
आयुष्यांत दाटी । कृदंतांची.
कालच्या कृतीला । आज ना वारस;
संतती औरस । संपली गा.
नामांच्या घोषांत । सरे 'सर्व'नाम;
धर्म, अर्थ, काम । एक झाले.
कर्माच्या पोटांत । स्वप्नाची ना कळ;
कर्ता असंगळ । जन्मदाता.
जन्मण्यापूर्वीच । ऐसे कैसे मेलों ?
वैकुंठास गेलों । आत्म्यावीण.
विशेषणें फक्त । माजलीं अनेक;
अव्यय तें एक । सांडलें गा.
अगा क्रियापदा । तुझ्या हातीं अर्थ;
बाकी सारा व्यर्थ । शब्दव्यूह.

# 'मी'च्या वेलांटीचा । सुटो सुटो फांस

'मी'च्या वेलांटीचा । सुटो सुटो फांस;
वेढा क्षितिजास । नको त्याचा.
एका सुईपोटीं । कोटी कोटी हात,
भविष्य नी भूत । भेटताती.
रित्या स्वातंत्र्याचें । मिथ्या अवसान;
थोर आणि सान । बांधलेले.
बांधणारी शक्ती । अव्यक्त, अपार;
तिचाही आचार । बांधलेला.
विभ्रम सांडतां । बांधिल्याचें ज्ञान;
हेंच शक्तिस्थान । ज्ञानियांचें.
ज्ञानांतून उठे । स्वातंत्र्याची लाट;
तेव्हां लाभे घाट । भविष्याला.
यंत्राचें गा चक्र । स्वतःभोतीं फिरे
म्हणोनी का ठरे । आत्मनिष्ठ ?
समष्टीविचारें । केलेंपण गळे;
सृजनाचें कळे । परंगुह्य.

REFBK-0010596
REFBK-0010596

## मानवाचें अंतीं । एक गोत्र

मिसिसिपीमध्यें । मिसळूं दे गंगा;
ऱ्हाइनमध्यें ‘ नंगा ’ । करो स्नान.
सिंधूसाठीं झुरो । ॲमेझॉन थोर
कांगो बंडखोर । टेम्ससाठीं.
नाईलच्या कांठीं । ‘ रॉकी ’ करो संध्या;
संस्कृती अन् वंध्या । नष्ट होवो.
व्होल्गाचें तें पाणी । वाहूं दे गंगेंत;
लाभो निग्रोरेत । पांढरीला.
माझा हिमाचल । धरो अंतर्पट;
लग्नासाठीं भट । वेदद्रष्टा !
रक्तारक्तांतील । कोसळोत भिंती;
मानवाचें अंतीं । एक गोत्र.
छप्पन भाषांचा । केलासे गौरव
तोचि ज्ञानदेव । जन्मा येवो.
जागृतांनो फेका । प्राणांच्या अक्षता
ऐसा योग आतां । पुन्हा नाहीं !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकमत
नुक्रम 68340 वि: काव्य
क्रमांक 9226 नों दि 22/3/6?